अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com


सोमवार दि. १९ डिसेंबर २०२२ ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : ८३ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८



## मेस्सीचं स्वप्न साकार! अर्जेंटिना विजयी

### पैनल्टी शूटआऊटमध्ये ४-२ ने फ्रान्स संघावर मात

फिफा विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात फुटबॉल इतिहासातील एक सर्वात रोमहर्षक असा सामना पाहायला मिळाला. आधी अतिरिक्त वेळ त्यानंतर पेनल्टी शूटआऊट असं सारंकाही असणाऱ्या या सामन्यात पेनल्टी शूटआऊट झालं. ज्यामध्ये अर्जेंटिना संघाने फ्रान्सवर ४-२ असा विजय मिळवत वर्ल्ड कप जिंकला आहे. विशेष म्हणजे ज्या मेस्सीसाठी अर्जेंटिनाला हा कप जिंकायचा होता, त्या मेस्सीनेच सामन्यात सर्वोत्कृष्ट कामगिरी केली. पेनल्टी शूटआऊटमधील गोल पकडून एकून तीन गोल मेस्सीनं केले.



# खिंडीत गाठण्याची महाआघाडीची रणनीती; शिंदे-फडणवीस सरकारची होणार फजिती

## राज्यच सुखी नाही, चहा कसा घ्यायचा?...अजितदादांनी फटकारले

सुराज्य/नागपूर

**राज्य विधी मंडळाचे हिवाळी अधिवेशन आजपासून नागपुरात सुरू होत आहे. मंत्री-संत्री,आमदार आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांचे अख्खे मंत्रालय या संत्रानगरीत डेरेदाखल झाले आहे.एकंदरीत नागपुरात राजकीय जत्रा दिसत असून अधिवेशनस्थळी पोलिसांची छावणी पडली आहे.राज्यात गेल्या काही दिवसांपासून राजकीय पटलावर पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे.वादग्रस्त विधाने, सत्ताधारी व विरोधक यांच्या आरोप-प्रत्यारोपांच्या झडलेल्या फैरी, शाईफेक आणि महाविकास आघाडीचा मोर्चा यामुळे राजकीय वातावरण तप्त झाले आहे. शिंदे-फडणवीस यांच्या सरकारवर विरोधकांचा असलेला राग रस्त्यावर आंदोलनाच्या माध्यमातून व्यक्त झाला पण आता अनेक प्रश्न हाती घेवून याच सरकारला खिंडीत (हाऊसमध्ये) गाठण्याची रणनीती महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आखली आहे. त्यामुळे सरकारची फजिती होणार यात शंकाच नाही.**



अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला प्रथेप्रमाणे सरकारकडून विरोधी पक्षांसाठी चहापानाचे आयोजन करण्यात आले होते परंतु राजकीय रितीरिवाजानुसार महाआघाडीच्या नेत्यांनी त्यावर बहिष्कार टाकला. दोन वर्षांच्या खंडानंतर सोमवारपासून राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला उपराजधानी नागपूर येथे सुरुवात होत आहे. यंदाही विविध मुद्द्यावरुन सरकारला घेरण्याची रणनीती विरोधी पक्षाने आखली आहे. विरोधकांनी ताणून धरल्यास कामकाजाऐवजी अधिवेशनात गोंधळच जास्त होऊ शकतो. विधिमंडळाच्या उभय सभागृहांमध्ये राज्यपाल कोश्यारी यांना लक्ष्य केले जाईल. तसेच त्यांच्या हकालपट्टीच्या मागणीसाठी गोंधळ घातला जाईल. दुसरीकडे सीमावाद प्रश्नावरुन विरोधी पक्ष अतिशय आक्रमक भूमिका घेऊन राज्य सरकारला कोंडीत पकडण्याच्या तयारीत आहे. विरोधी पक्षनेते अजितदादा पवार यांनी फुल्ल टोलेबाजी करत सरकारच्या भूमिकेचे पोस्टमार्टेम केले. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी आणि सत्ताधारी पक्षाचे नेते आमदार महापुरुषांबद्दल बेताल वक्तव्य करत आहेत. ती काही केल्या थांबायला तयार नाहीत. बरे त्याबद्दल त्यांनी आणखी माफिही मागितली नाही. दुसरीकडे महाराष्ट्र कर्नाटकचा सीमावादाचा प्रश्न तापलेला असताना राज्याचे मुख्यमंत्री मूग गिळून गप्प आहेत. कर्नाटकचे मुख्यमंत्री धमकीची भाषा करत असताना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री साधे आक्रमकपणाने बोलतही नाहीत. अशा परिस्थितीत राज्यातली काही गावे दुसऱ्या राज्यात जाण्याची इच्छा व्यक्त करतात त्यावरही मुख्यमंत्री ठोसपणे काही भूमिका घेत नाहीयेत. तसेच राज्यातले प्रकल्प दुसऱ्या राज्यात जात असताना मुख्यमंत्री आणि त्यांचे सरकार डोळे उघडे ठेऊन बघत बसलेत. त्यामुळे लाख कोटींची गुंतवणूक महाराष्ट्रातून गेली आहे. लाखो युवकांच्या हातून रोजगार गेलाय. विदर्भाच्या अनुशेषाचा प्रश्न कायम आहे, अतिवृष्टीत शेतकऱ्यांना मदत मिळालेली नाहीये, असे अनेक प्रश्न असताना राज्य सरकारने आयोजित केलेल्या चहापानाला जाणे आमच्या बुद्धीला पटत नाही, असे अजितदादा म्हणाले. सरकारने आयोजित केलेला अधिवेशन कालावधी वाढवून किमान तीन आठवड्यांचं अधिवेशन घ्यावं, अशी मागणीही त्यांनी केली.

### मुख्यमंत्र्यांचाही प्रतिटोला...

हे खोके सरकार आहे. हे स्थगिती सरकार आहे. हे घटनाबाह्य सरकार आहे, असे अजितदादा म्हणाले होते.त्याला प्रतिउत्तर देताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, हे सरकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या घटनेनुसार कायदेशीर आणि बहुमताच्या जोरावर स्थापन झाले आहे.तेही जनमताचा आदर राखून. २०१९ ला स्थापन झालेले सरकार पूर्णपणे अनैतिक होते. सोयरीक एकाशी केली आणि संसार दुसऱ्याशी थाटला. हे सर्व जनतेला माहित आहे. कुणी कुणाशी काय केले, हे महा राष्ट्रातील जनता जाणून आहे.खोके सरकारवर यापूर्वी जास्त काही बोललो नाही. पण अजितदादांच्या तोंडून खोक्यांची भाषा शोभणारी नाही. कारण खोक्यांचा जर एकावर एक ढिग लावला तर एवढे 'शिखर' उंच होईल की बघता बघता नजर पोहोचणार नाही. पोहोचली तर तिथून कडेलोट होईल. यावर विधानसभेत बोलेन. शिखर बँक गैरव्यवहारावरुन शिंदे यांनी अजितदादांना हा टोला लगावल्याचे सांगण्यात येते.

**फडणवीसांना सुनावले :** फडणवीस यांनी शनिवारी नाकाखालून सरकार नेल्याची टीका केली होती. त्यावर उत्तर देताना पवार म्हणाले, नाकाचा उल्लेख त्यांनी करावा हे दुर्दैव आहे. प्रत्येकाची नाके तपासावी लागतील. मात्र त्याच्या खोलात मला जायचे नाही. हे लोक एकेकाळी एकनाथ शिंदे यांच्या बंडाच्या भूमिकेवेळी त्यांचा तो अंतर्गत निर्णय आहे, आमचा त्यांच्याशी संबंध नाही, असे सांगायचे. नंतर मी बदला घेतला म्हणायला लागले, फोन करुन पाठवले, असेही सांगितले. आघाडी सरकार आल्यापासून त्यांना वेदना होत होत्या. पहिल्या दिवसापासून सरकार घालविण्यासाठी ते कामाला लागले होते. नाकाखालून सरकार नेले की आणखी कशा खालून सरकार नेले हा संशोधनाचा विषय आहे, अशा आक्रमक शब्दात त्यांनी फडणवीसांना फटकारले.

# नवीन रेल्वे मार्गावरून भीतीचे वातावरण; आ.देशमुखांनी केली पाहणी

## पुढील आठवड्यात अधिकाऱ्यांसमवेत बैठक

सुराज्य/सोलापूर

**सोलापूर शहरातील वसंत विहार, यश नगर भाग २ तसेच बाळे परिसर या भागातून नव्याने होणारे सोलापूर -तुळजापूर- उस्मानाबाद या रेल्वे ट्रॅकचा मार्ग जाणार आहे. यासाठी निघालेल्या आदेशामुळे या परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. त्याची दखल घेत आ. विजयकुमार देशमुख यांनी परिसराची जाऊ नागरिकांची भेट घेतली आणि संवाद साधला यावर आता पुढील आठवड्यात बैठक घेतली जाणार असल्याचे आ. देशमुख यांनी सांगितले**

सोलापूर -तुळजापूर- उस्मानाबाद नवीन रेल्वे मार्गासाठी या भागातील जागा संपदित केली जाणार आहे. कष्टातून बनवलेले घर आता पडणार या भीतीने लोकांची रात्रीची झोपच उडाली आहे. अनेक जण घाबरलेल्या अवस्थेत आहेत. या लोकांच्या मनात निर्माण झालेला संभ्रम आणि शंका दूर करण्यासाठी आ. देशमुख, उपजिल्हाधिकारी भारत वाघमारे, माजी विरोधी पक्षनेते अमोल शिंदे, किरण पवार व परिसरातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आ. देशमुख आणि उपजिल्हाधिकारी वाघमारे यांनी नागरिकांच्या मनातील भीती दूर करण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी रेल्वे मंत्रालय आणि जिल्हा प्रशासनाची बैठक लावून यावर काही तोडगा काढता येणार आहे. खा. महास्वामी यांच्याशी देखील आ. देशमुख यांनी संवाद साधला असता चौकशी करून माहिती घेऊन बैठक लावण्याचे आश्वासन दिले तर जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी निघालेल्या आदेशाच्या विरोधात हरकती सूचना दाखल करण्यास सांगितले आहे.

त्यानंतर त्यावर सुनावणी घेऊन बैठक घेतली जाईल असे सांगितले.



# लव्हे येथील शेतकऱ्यास २१ लाखास गंडविले; परभणीच्या दोघांवर गुन्हा

कुर्डूवाडी : ऊस तोडण्यासाठी कामगार पुरवतो अशी थाप मारून शेतकऱ्यास २१ लाख ४९ हजारास गंडविल्याची घटना लव्हे (ता.माढा) येथे नुकतीच उघडकीस आली. या प्रकरणात कुर्डूवाडीच्या पोलिसांनी बाळासाहेब बापूराव राठोड आणि विजय प्रल्हाद चव्हाण (दोघे रा.केहाळ ता.जिंतूर जि.परभणी) या दोघाविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

यासंदर्भात बापू सदाशिव ढवळे (वय५२ रा.लव्हे ता. माढा) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. त्यांच्या शेतात ऊस तोडीसाठी मजुर पाहिजे होते. तेंव्हा परभणी जिल्ह्यातील राठोड आणि चव्हाण या दोघांनी आम्ही मुकदम आहोत ऊसतोड मजुर पुरवतो असे सांगितले. आणि त्यांच्याकडून तसेच राहूल चोपडे(जावई) यांच्याकडून फेब्रुवारी ते ऑक्टोबर या दरम्यान रोख आणि फोन पे च्या माध्यमातून २१ लाख ४९ हजार रुपये घेतले होते. त्यानंतर त्यांनी मजूर पुरवले नाही तसेच पैसे देखील परत केले नाही. दोघांनी मिळून फसवणूक केली. अशा आशयाची फिर्याद ढवळे यांनी पोलिसात दाखल केली. घोरपडे पुढील तपास करीत आहेत.




बाळे येथील खंडोबा मंदिरात रविवारी दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती.

# जिल्ह्यात १८९ ग्रा.पं.साठी ८१.१९ टक्के मतदान

## संपूर्ण राज्यातील ग्रामपंचायत निवडणुकीसाठी सुमारे ७४ टक्के मतदान

सुराज्य/सोलापूर

राज्यातील ७ हजार १३५ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकींसाठी आज सुमारे ७४ टक्के मतदान पूर्ण झाले आहे. सदस्यपदांसह थेट सरपंचपदासाठीदेखील मतदान पार पडले.

राज्य निवडणूक आयोगाने ७ हजार ७५१ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांची घोषणा केली होती. त्यातील काही ठिकाणी सरपंचपदाच्या, तर काही ठिकाणी सदस्यपदाच्या निवडणुका बिनविरोध झाल्या. त्यामुळे आज प्रत्यक्षात ७ हजार १३५ ग्रामपंचायतींसाठी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान झाले.सोलापूर जिल्ह्यात १८९ ग्रा.पं.साठी ८१.१९ टक्के मतदान झाल्याचे प्रशासनाकडून जाहीर करण्यात आले.

दुपारी ३.३० पर्यंत प्राथमिक माहितीनुसार सरासरी ६७ टक्के मतदान झाले होते. नक्षलग्रस्तभागात दुपारी ३.३० वाजेपर्यंतच मतदानाची वेळ होती. मात्र, आता २० डिसेंबर निवडणुकीचा निकाल जाहीर करण्यात येईल. ग्रामपंचायत निवडणुकीत झालेल्या या मतदानात जनतेने नेमका कुणाला कौल दिला हे अवघ्या दोन दिवसांत कळणार आहे.

### प्रत्यक्ष मतदान झालेल्या ग्रामपंचायतींची जिल्हानिहाय संख्या

ठाणे - ३५, पालघर - ६२, रायगड - १९१, रत्नागिरी - १६३, सिंधुदुर्ग - २९१, नाशिक - १८८, धुळे - ११८, जळगाव - १२२, अहमदनगर - १९५, नंदुरबार - ११७, पुणे - १७६, सोलापूर - १६९, सातारा - २५९, सांगली - ४१६, कोल्हापूर - ४२९, औरंगाबाद - २०८, बीड - ६७१, नांदेड - १६०, उस्मानाबाद- १६५, परभणी - ११९, जालना - २५४, लातूर - ३३८, हिंगोली - ६१, अमरावती - २५२, अकोला - २६५, यवतमाळ - ९३, बुलडाणा - २६१, वाशीम - २८०, नागपूर - २३४, वर्धा - १११, चंद्रपूर - ५८, भंडारा - ३०४, गोंदिया - ३४५, गडचिरोली- २५. अशा एकूण ७ हजार १३५ ग्रामपंचायतींसाठी मतदान प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




जिंकलो तर माझ्यामुळं...
हरलो तर त्यांच्यामुळं..!

# मुख्यमंत्री, मंत्रिमंडळ लोकायुक्तांच्या कक्षेत : फडणवीस

नागपूर : मुख्यमंत्री, मंत्रिमंडळ व भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा लोकायुक्ताच्या कक्षेत आणण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे. त्याचा मसुदा तयार करण्यात आला आहे. त्यानुसार त्याचा कायदा केला जाणार आहे. त्याचे विधेयक मंजुरीसाठी हिवाळी अधिवेशनात सभागृहासमोर ठेवले जाणार असल्याची माहिती उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी दिली. हा कायदा मंजूर झाल्यास मुख्यमंत्री व मंत्रिमंडळाच्या विरोधात लोकायुक्तांकडे थेट तक्रार करता येणार आहे.

फडणवीस म्हणाले, महाराष्ट्रात लोकायुक्ताचा कायदा नव्हता. त्यासाठी पावले उचलली गेली नाहीत. मात्र आमच्या सरकारने या कायद्याचा मसुदा तयार केला. लोकायुक्तची व्याप्ती वाढवली. भ्रष्टाचार निर्मुलनासाठी त्याचा कायदा होणार आहे. लोकायुक्तचे प्रमुख उच्च न्यायालयाचे निवृत्त मुख्य न्यायाधीश किंवा सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त सरन्यायाधीश असतील. दोन न्यायाधीशांचे खंडपीठ असेल. जेणेकरुन भ्रष्टाचाराचे उच्चाटन करता येईल.

ते म्हणाले, महापुरुषांचा अपमान केल्याचा मुद्दा विरोधक वारंवार उपस्थितीत करत आहेत. ज्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म नेमका कोठे झाला हे माहिती नाही. जे वारकऱ्यांचा अपमान करणाऱ्यांना सोबत घेऊन फिरतात. त्यांनी महापुरुषांच्या अपमानाबाबत बोलू नये. मुळात महापुरुषांचा अपमान कोणीच करु नये. विरोधीपक्ष नेते अजित पवार यांनी अधिवेशन तीन आठवड्यांचे का नाही, असा मुद्दा उपस्थित केला. त्यालाही फडणवीस यांनी उत्तर दिले. ते म्हणाले, ज्यांनी नागपुरात दोन दिवस पण अधिवेशन घेतले नाही. तेच प्रश्न विचारत आहेत. पण त्यांचीही ईच्छा पूर्ण केली जाईल. एकट्या एमएमआरडीएने ६० हजार कोटींचे कर्ज घेतले या अजित पवार यांच्या प्रश्नालाही उप मुख्यमंत्री फडणवीस यांनी उत्तर दिले. ते म्हणाले, राज्य शासन कर्ज देत नाही तर कर्ज घेण्यासाठी परवानगी देते. केवळ एमएमआरडीएने कर्ज घेतले असले तरी विकासकामे वेगाने सुरु आहेत. राज्यातील अन्य भागांचाही विकास सुरु आहे, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

**फडणवीस म्हणाले,**

महाराष्ट्रात लोकायुक्ताचा कायदा नव्हता. त्यासाठी पावले उचलली गेली नाहीत. मात्र आमच्या सरकारने या कायद्याचा मसुदा तयार केला. लोकायुक्तची व्याप्ती वाढवली. भ्रष्टाचार निर्मुलनासाठी त्याचा कायदा होणार आहे. लोकायुक्तचे प्रमुख उच्च न्यायालयाचे निवृत्त मुख्य न्यायाधीश किंवा सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त सरन्यायाधीश असतील. दोन न्यायाधीशांचे खंडपीठ असेल. जेणेकरुन भ्रष्टाचाराचे उच्चाटन करता येईल.



# अधिवेशनाची उत्सुकता

राज्य विधी मंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला आजपासून नागपूर येथे प्रारंभ होईल. मंत्रालयातील अधिकारी आणि मंत्री-आमदार नागपुरात डेरेदाखल झाले असून राज्यभर या अधिवेशनाची उत्सुकता निर्माण झालेली आहे. राज्यात सत्तांतर झाल्यानंतर शिंदे-फडणवीस यांच्या सरकारचे हे पहिलेच अधिवेशन. राज्यातील राजकिय वातावरण सध्या 'गरम'च आहे तेव्हा अधिवेशन 'नरम'पणे पार पडेल, अशी शक्यता कुणी गृहीत धरूच नये. शिवसेना फोडून आपली सत्ता उलथवून टाकली हा एक राग आघाडी नेत्यांच्या डोक्यात सबला आहे. त्यातच राज्यपाल भगतसिंग कोश्यारी आणि भाजप नेते चंद्रकांतदादा पाटील यांनी वादग्रस्त विधाने केल्यानंतर विरोधकांनी राज्यभर आंदोलने केली. शनिवारी मुंबईत मोठा मोर्चा काढण्यात आला.विरोधकांचा वचपा काढण्यास सत्ताधारी पक्ष सज्ज असणार यात शंकाच नाही. तेव्हा हाउसमध्ये विकासावर व जनतेच्या प्रश्नांवर चर्चा होईल, असे वाटत नाही. सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातील हमरीतुमरीच पहायला मिळेल, असे वाटते. सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांकडून महापुरुषांबद्दल झालेली अवमानकारक विधाने, कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्रातील गावांवर हक्क सांगून सीमावादाला दिलेली फोडणी, महाराष्ट्रात होऊ घातलेले उद्योग शेवटच्या क्षणी गुजरातच्या पदरात पडणे, राज्यात ओला दुष्काळ जाहीर करण्याची विरोधी पक्षाची मागणी, वाढती महागाई आणि बेरोजगारी अशा अनेक ज्वलंत मुद्यांमुळे नागपूर येथे होऊ घातलेले राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन वादळी ठरण्याची शक्यता असून हे अधिवेशन सत्ताधारी पक्षासाठी कसोटीचे ठरणार आहे. महाविकास आघाडीचा अभूतपूर्व मोर्चा म्हणजे आपण आता अधिक आक्रमक झाल्याचे संकेत विरोधी



पक्षाच्या नेत्यांनी दिले आहेत. कोरोना संसर्गामुळे सलग दोन वर्षे नागपूरला राज्य विधिमंडळाचे अधिवेशन होऊ शकले नाही. आता कोरोनाची साथ नियंत्रणात आल्याने नागपूर अधिवेशनासाठी सत्ताधारी आणि विरोधी पक्षात जोरदार उत्साह आहे. अधिवेशनाची तयारी पूर्ण झाली असून अधिवेशनानिमित्त येणारे मंत्री, आमदार, अधिकारी यांच्या स्वागतासाठी संत्रानगरी सज्ज झाली आहे. गेल्या महिन्यात कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्याविषयी अनुद्गार काढल्याचे प्रकरण ताजे असताना राज्यात राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी वादग्रस्त विधान केले. त्यामुळे विरोधी पक्षासह सत्ताधारी भाजपचे खासदार उदयनराजे भोसले यांनी राज्यपालांच्या विरोधात संताप व्यक्त केला होता. विरोधकांनी राज्यपाल हटाव'ची मागणी केली असताना राज्यपालांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना पत्र लिहून सारवासारव केली. राज्यपालांच्या पाठोपाठ भाजपचे विधान परिषद सदस्य प्रसाद लाड यांनी शिवाजी महाराजांच्या जन्मावरून नवा वाद निर्माण केला होता. पर्यटनमंत्री मंगल प्रभात लोढा यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवरायांशी तुलना केली होती, तर उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी शिक्षण संस्थाचालकांना सरकारी अनुदानावरून सल्ला देण्याच्या नादात महात्मा जोतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याविषयी वादग्रस्त शब्द वापरला. त्यावरून मोठा राजकिय गदारोळ उडाला होता. खुद्द पाटील यांच्यावर शाईफेक होऊन त्यांना संतापाची धग बसली होती. पाटील यांनी याप्रकरणी माफी मागून वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला असला तरी विरोधी पक्ष या मुद्यावरून संबंधित मंत्र्यांना धारेवर धरण्याच्या तयारीत असल्याचे सांगण्यात येते. अशातच राज्याच्या सीमावर्ती भागातील गावांनी अन्य राज्यात समावेश होण्याची मागणी केली आहे. या प्रश्नावर विरोधी पक्ष सभागृहात आणि सभागृहाबाहेर आक्रमक राहणार असल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सीमाप्रश्नावर ठराव मांडण्याची शक्यता आहे. गुजरात विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर महाराष्ट्रात होऊ घातलेले लाखो कोटी रुपये गुंतवणुकीचे प्रकल्प गुजरातला गेले. विशेषतः वेदांता-फॉक्सकॉन प्रकल्पावरून सत्ताधारी आणि विरोधी पक्षात आरोप-प्रत्यारोप रंगले होते. वेदांता- फॉक्सकॉनपाठोपाठ अन्य प्रकल्पही गुजरातला गेले. त्यावरून विरोधी पक्षाने सरकारला अधिवेशनात उघडे पाडण्याचा निर्धार नक्कीच असेल. त्यामुळे हा मुद्दा अधिवेशनात गाजण्याची शक्यता आहे.

## राजकीय

# 'गलवान'नंतर तवांग

**दि. १६ ऑक्टोबर १९२२. चीनची राजधानी बिजिंगमधील ग्रेट हॉल ऑफ द पीपल येथे चीनमधील कम्युनिस्ट पक्षांची बैठक होती. पक्षाचे अडीच हजार डेलिगेट्स बैठकीला शिस्तीने उपस्थित होते. ही बैठक म्हणजे कम्युनिस्ट पार्टी ऑफ चायनाचे संमेलन होते. सीपीसी हा चीनमध्ये एकच राजकीय पक्ष आहे. कम्युनिस्ट क्रांतीच्या नावावर हाच पक्ष १९४८ पासून चीनमध्ये सत्तेवर आहे. दर पाच वर्षांनी सीपीसी संमेलन होते व त्यात चीनमधील मोठ्या निर्णयांवर शिक्कामोर्तब होते. चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग जेव्हा मंचावर आले, तेंव्हा पडद्यावर एक व्हीडिओ दाखवला जात होता. त्यात गलवान घाटीमध्ये चीन व भारतीय सैन्याबरोबर जी चकमक झाली त्याची दृश्ये दाखवली जात होती. चिनी सैन्याचा कमांडर सैन्याला घेऊन भारतीय सैन्याकडे चाल करून जात असतानाची ही दृश्ये होती. याच व्हिडिओतून चीनने भारताशी आपले संबंध कसे असतील, याचे धोरणच दाखवून दिले होते.**

दि. ९ डिसेंबर रोजी चिनी सैन्याने अरुणाचल प्रदेशमध्ये घुसखोरी करण्याचा प्रयत्न केला व भारतीय सैन्य दलाने तो हाणून पाडला. चिनी सैनिकांनी एलओसी (प्रत्यक्ष नियंत्रण रेषा) ओलांडून भारताच्या हद्दीत घुसण्याचा प्रयत्न केला, पण भारतीय सैन्याने त्यांना दंडुके मारून पिटाळून लावले. भारत-चीन दरम्यान एलओसी ४०५६ किमी लांबीची असून त्यांचे पश्चिम सेक्टर अस्काई चीन, मध्य सेक्टर (जम्मू-काश्मीर) आणि पूर्व सेक्टर (अरुणाचल प्रदेश) असे तीन हिस्से आहेत. सन २०१७ मध्ये चिनी सैन्याने डोकलाममध्ये घुसखोरी केली होती, तेव्हा तब्बल तीन महिने भारत-चीन सैन्य एकमेकांच्या आमने-सामने होते. आता तवांगमधील घुसखोरीवरून वादंग पेटले आहे. अरुणाचल प्रदेश हा आपला प्रदेश आहे, असा दावा चीनने यापूर्वीच केला आहे.

सन १९४९ मध्ये चीनचे नेते माओने म्हटले होते की, हात आणि हाताची पाच बोटे ही आपली आहेत, ती आपण परत घेतली पाहिजेत. हात म्हणजे तिबेट, ५ बोटे म्हणजे लडाख, सिक्किम, अरुणाचल प्रदेश, भूतान आणि नेपाळ. दोनच वर्षांनंतर म्हणजे १९५१ मध्ये चीनने तिबेटवर हल्ला करून तो प्रदेश आपल्या ताब्यात घेतला. सन १९६२ मध्ये चीनने भारतावर मोठे आक्रमण केले. पण त्यापूर्वीच १९५९ पासून भारतीय सैन्याबरोबर छोट्या-मोठ्या झटापटी चालू ठेवल्या होत्या. १९६२ मध्ये चीनने भारतावर युद्धच लादले होते. १९६१ मध्येच युद्धाच्या अगोदर चीन सैन्याने मॅकमोहन रेषेलगत गस्त घालणे सुरू केले होते. त्या काळात भारताच्या हद्दीत घुसण्याचा चीनने अनेकदा प्रयत्न केला. भारताने तक्रार केली की, आम्ही आमच्या हद्दीतच गस्त घालतो आहोत, असे चीन उत्तर देत असे. १० जुलै १९६२ रोजी साडेतीनशे चिनी सैनिकांनी भारताच्या सुरक्षा चौकीलाच घेरण्याचा प्रयत्न केला.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर दोन वर्षांनी माओ जे दोंग यांनी पीपल्स रिपब्लिक ऑफ चायनाची स्थापना केली. त्यानंतर दोनच वर्षांनी चीनने सरहद्दीच्या प्रश्नावरून भारताशी वादावादी सुरू केली. १९६२ मध्ये मॅकमोहन रेषा ओलांडून चीनचे सैन्य भारतात घुसले होते, तेव्हा मोठा रक्तपात झाला. एक महिना युद्ध चालू होते. चीनने नंतर युद्धबंदी जाहीर केली व एलएसी अस्तित्वात आली.

सन १९६७ मध्ये सिक्कीमधील डोंगराळ भागातील रस्त्यांवर चीनने केबल्स टाकायला सुरुवात केली. तेव्हाही दोन्ही देशांच्या सैन्यात चकमकी उडाल्या. गोळीबार झाला. नथुलामधून चीनला हटवण्यात आले. १९८७ मध्ये भारताने सैन्यासाठी प्रशिक्षण मोहीम चालवली होती. तेव्हा चीनच्या चौक्यांवर चिनी सैन्यांची मोठी जमवाजमव केली गेली. जून २०२० मध्ये हिमालयातील गलवान खोऱ्यात चीनने घुसखोरी केली. तेव्हा मोठी चकमक झाली. गेल्या चाळीस वर्षांतील ती सर्वात मोठी होती. वीस भारतीय जवान शहीद झाले. या घटनेने सरहद्दीवर बरेच दिवस तणाव होता. अरुणाचल प्रदेशात ९ डिसेंबर २०२२ रोजी भारतीय जवान व चिनी सैन्यात झालेल्या चकमकीचे व्हीडिओ सर्वत्र सोशल मीडियावर व्हायरल झाले. त्यात भारतीय जवान चिनी सैनिकांना दंडुक्यानी व लाठ्यांनी बदडून पिटाळून लावत असल्याचे दृश्य आहे. हा २ मिनिटे ११ सेकंदांचा व्हीडिओ खरा असल्याचा अधिकृतपणे सरकारने किंवा भारतीय सैन्यदलाने दावा केलेला नाही. हा व्हिडिओ गेल्या वर्षी झालेल्या चकमकीचा असावा, असे अनेकांचे मत पडले.



अरुणाचल प्रदेशात १७ हजार फूट उंचीवर असलेली तवांग पोस्ट हे सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे ठिकाण आहे. तवांगमधून अरुणाचल प्रदेशवर लक्ष ठेवता येते म्हणूनच चीनला त्याचे महत्त्व वाटते. १९६२ मध्ये चीनने तवांगवर कब्जा केला होता. नंतर युद्धविराम झाल्यानंतर सैन्य मागे घेण्यात आले. तवांग हे भारताच्या हद्दीत मॅकमोहन रेषेच्या अलिकडे आहे, पण त्यावर चीनची नजर आहे. तवांग हे चीन व भूतानचे जंक्शनच आहे. तेथून तिबेटवरही लक्ष ठेवता येते. तिबेटचे धर्मगुरू दलाई लामा हे १९५९ मध्ये तिबेटमधून बाहेर पडले व तवांगमध्ये राहिले होते, तवांगमध्ये मोठा बौद्ध मठ आहे. म्हणून तवांग हे चीनच्या दृष्टीने प्रतिष्ठेचा मुद्दा आहे.

दि. २३ मे १९५० रोजी चीनच्या हजारो सैन्याने तिबेटवर हल्ला केला व तिबेटवर कब्जा मिळवला होता. तिबेटमधील जवळपास ८० टक्के लोकसंख्या बौद्ध आहे. दलाई लामा हे तिबेटमधून बाहेर पडल्यावर त्यांनी बरोबर शरीररक्षक न घेता बिजिंगला यावे, असे निमंत्रण चीनने त्यांना दिले होते. पण, चीनचे सरकार त्यांना अटक करील म्हणून दलाई लामांच्या समर्थकांनी त्यांना घेरले होते. पुढे दलाई लामा हे भारतात आले, १९६२ साली चीनने भारतावर लादलेल्या युद्धामागे हे सुद्धा एक कारण असू शकते. दि. ९ डिसेंबर रोजी तवांग येथे झालेल्या भारत-चीन चकमकीची सर्व जगातील मीडियाने दखल घेतली. भारतीय सैन्याने चिनी सैन्याची घुसखोरी मोडून काढली व त्यांना पिटाळून लावले, हे सर्व वास्तव मीडियामुळे सर्व जगाला समजले. या घटनेचे संसदेच्या हिवाळी अधिवेशनात पडसाद उमटले. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा व संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी या घटनेची माहिती देताना भारतीय सेनेने केलेल्या पराक्रमाबद्दल सेनादलाचे कौतुक केले. या चकमकीत कोणीही ठार झाले नाही किंवा कोणी जखमी झाले नाही, हे सरकारने स्पष्ट केले. अमित शहा यांनी तर भारताची एक इंचही जमीन चीन घेऊ शकत नाही, असे ठामपणे सांगितले. तरीही काँग्रेससह सर्व विरोधी पक्षांनी केंद्र सरकार माहिती लपवत आहे, असा आरोप करून संसदेत थयथयाट केला. खरे तर संरक्षणाच्या मुद्द्यांवर सर्व देश एक आहे व सैन्य दलाचा देशाला अभिमान आहे, असा एकमुखी संदेश जगाला देणे अपेक्षित होते, पण भाजपला विरोध करण्याच्या नादात आपण भारतीय सेना दलाच्या कामगिरीवर संशय निर्माण करीत आहोत, याचेही भान विरोधकांनी ठेवले नाही. अमित शहा यांनी काँग्रेसच्या आरोपांना उत्तर देताना म्हटले, काँग्रेसच्या म्हणण्यानुसार भारताची हजारो चौरस किमी जमीन चीनची झाली आहे. काँग्रेसच्या म्हणण्यानुसार संयुक्त राष्ट्रसंघात भारताला कायमचे सदस्यत्व मिळणार नाही, पण सर्व जनतेला ठाऊक आहे की, २००५ ते २००७ या काळात राजीव गांधी फाऊंडेशनसाठी काँग्रेसने चीनकडून १ कोटी ३५ लाख रुपये देणगी घेतली होती. त्याची नोंद चीनच्या उल्लेखासह वार्षिक अहवालात आहे. अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री पेमा खंडू यांनी म्हटले आहे - 'मार नही खाएंगे, मुहतोड जबाब देंगे, कोई अतिक्रमण करने की कोशिश करते हैं, तो हमारे बहादूर सैनिक उनको जवाब देंगे। ईट का जवाब पत्थरसे नहीं, तो लोहेसे दे रही हैं हमारी भारतीय वीर सेना।

**- सुकृत खांडेकर.**

## टुडेज ब्लॉग

# गोवा मुक्ती दिन

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वातंत्र्य झाला. दिडशे वर्ष राज्य करून इंग्रज भारतातून निघून गेले. संपूर्ण देशात स्वातंत्र्याची पहाट उगवली पण भारतातील एक छोटेशे निसर्गरम्य बेट असलेले गोवा मात्र पारतंत्र्यातच होते. गोव्यावर पोर्तुगीजांची सत्ता होती. १५१० मध्ये पोर्तुगीजांनी गोव्यात पाय ठेवला तेंव्हापासून गोमंतकिय जनतेचे नष्टचर्य सुरू झाले होते. तब्बल साडेचारशे वर्ष पारतंत्र्यात राहिलेल्या गोव्याचे नष्टचर्य १९ डिसेंबर १९६१ रोजी संपले. १९६१ च्या युद्धानंतर भारतभूमीवरील उरलेसुरले पोर्तुगीज अधिपत्य समाप्त झाले, तसेच गोवा, दमन व दीव हा प्रदेश मुक्त झाला. कोकणपासून पेडणेपर्यंत पसरलेली गोव्याची निसर्गरम्य भूमी १९ डिसेंबर १९६१ रोजी भारताशी एकरुप झाली अर्थात १९६१ चे युद्ध हा गोवामुक्ती आंदोलनाचा निर्णायक भाग होता पण, गोवा मुक्ती आंदोलनाला खूप मोठा इतिहास आहे. १५ ऑगस्ट १९४७ रोजी देश स्वातंत्र्य झाल्यानंतर देशातील ५६५ संस्थाने भारतात विलीन झाले पण, पोर्तुगीजांनी गोवा, दीव, दमन, दादरा आणि नगरहवेली या आपल्या वसाहतीतून जाण्यास स्पष्ट नकार दिला. ते गोव्याचे भारतात विलिनीकरण करण्याच्या बाजूने नव्हते. पंतप्रधान पंडित नेहरु हे पोर्तुगीज वसाहतीशी चांगले संबंध प्रस्थापित करीत होते पण, तेथील प्रशासक मात्र त्यांना सहकार्य करीत नव्हते. गोमंतकिय जनताही पोर्तुगीजांच्या अत्याचाराला कंटाळून भारतात विलीन होण्यासाठी भारत सरकारने सहकार्य करावे, अशी मागणी करीत होते. पोर्तुगीज गोव्याला भारतात विलीन करण्याच्या विरोधात होते पण, जनतेला मात्र भारतात विलीन व्हावे असे वाटत होते. गोमंतकीय जनतेची इच्छा ओळखून पंतप्रधान नेहरू यांनी संयुक्त राष्ट्र संघाच्या माध्यमातून पोर्तुगीजांवर दबाव आणला. शांततेच्या मार्गाने भारत सोडून जाण्याचा संदेश त्यांनी पोर्तुगीजांना दिला पण पोर्तुगीजांनी या संदेशाला जुमानले नाही.




शांततेच्या मार्गाने पोर्तुगीज देश सोडून जात नाहीत, वाटाघाटी यशस्वी होत नाहीत हे लक्षात आल्यावर पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूंनी लष्कराला कारवाईचे आदेश दिले. भारताने लष्करी कारवाई करू नये म्हणून पोर्तुगीजांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरून दबाव आणण्याचा प्रयत्न केला. पोर्तुगीज सरकारची जुलूमशाही आणि आंदोलनाला मिळणारा जनतेचा तीव्र प्रतिसाद या पार्श्वभूमीवर नेहरुंनी १७ डिसेंबर १९६१ रोजी आंतरराष्ट्रीय दबावाला न जुमानता भारतीय सैन्य गोव्यात घुसवण्याचा निर्णय घेतला.

भारतीय सैन्याने पोर्तुगिजांचा पूर्ण पाडाव करुन १९ डिसेंबर १९६१ रोजी गोव्यात तिरंगा फडकवला आणि गोवा मुक्त झाला. साडेचारशे वर्ष पारतंत्र्यात असणाऱ्या गोव्यात स्वातंत्र्याची पहाट उगवली. दींव, दमन आधीच मुक्त झाले होते.

या तिघांना मिळून केंद्र सरकारने केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा दिला. नंतर १९६७ साली सार्वमताने गोवा घटक राज्य म्हणून घोषित झाले. पोर्तुगिजांच्या गुलामीतून मुक्त होऊन आज गोव्याला साठ वर्ष पूर्ण झाली. गोवा मुक्ती संग्रामाचे हे हिरक महोत्सवी वर्ष आहे. यानिमित्ताने गोव्यात वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. गोवामुक्ती दिनाच्या गोमंतकिय जनतेला मनापासून शुभेच्छा!

**- श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे.**

## जन्म हा अखेरचा

### धर्माचारस्थल - ४



कोणत्या ना कोणत्या प्रकारे त्याच्या भोजनाची व्यवस्था होत असते. जो कधीही अन्नदान करींत नाही, त्याची बाहेर निश्चित उपासमार होते. म्हणून दान हा अत्यंत महत्वाचा धर्म आहे. त्यामुळे आपल्या मनाचा उदारपणा लाभतो. दानामुळे आपले हृदय विशाल होऊ शकते. तुमचे हृदय देखील तेवढेच विशाल झाले पाहिजे. संपूर्ण समुद्र एका कमंडलूत मावणार नाही. पूर्ण समुद्र हवा असेल तर समुद्राएवढेच भांडे आणावे लागेल. अन्यथा समुद्र कमंडलूत मावत नाही म्हणून रडत बसावे लागेल. त्याप्रमाणे क्षुद्र हृदयात व्यापक परमात्मा राहूच शकणार नाही. त्यासाठी हृदय विशाल करायला हवे आणि दान केले तरच हृदय विशाल होईल. म्हणून प्रत्येकाने यथाशक्ती दान करुन आपले धार्मिक जीवन विकसित केले पाहिजे.

**धर्माचारस्थल - ५**

काशीक्षेत्राचे महात्म्य आपण प्रतिदिनी श्रवण करींत आहात. काशीच्या अनेक नावांपैकी एक नाव आहे. 'अविमुक्त क्षेत्र, अविनामुक्त: अविमुक्त:।' असे या नामाचे एक स्पष्टीकरण दिले जाते. अवि म्हणजे पाप, अर्थात हे क्षेत्र पापमुक्त आहे अथवा या क्षेत्रात आल्यावर पापांपासून मुक्ती मिळते, असा वरील व्युत्पत्तीचा अर्थ होतो.

**(क्रमश:) - काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

## जनमानस

### वाढते प्रदूषण : एक चिंताजनक बाब

राज्यातील अत्यंत प्रदूषण युक्त शहरात पहिल्या दहा क्रमांकात पुणे व पिंपरी चिंचवड ही दोन शहरे आहेत. ही बातमी नुकतीच वाचली. एका आकडेवारीनुसार पुण्यात वाहनांची संख्या ४० लाखाहून अधिक आहे. त्यात चारचाकी वाहनांची संख्या ७ लाख ३३ हजाराहून अधिक आहे. पुणे व परिसरातील हवा वर्षातील पाच महिने धोकादायक पातळीवर असते. वाहनाच्या धुरामुळे नायट्रोजन, सल्फर तसेच कार्बन, हे घटक हवेत मिसळतात. त्यामुळे नागरिकांना डोळे चुरचुरणे, घसा दुखणे, त्वचेचे रोग, हृदय विकार, अस्थमा, नैराश्य, चिडचिड, अस्वस्थता व इतर श्वसनांचे आजार होतात.

पुण्याचे हवामान टिकविण्यासाठी व पुढच्या पिढीला चांगल्या हवेत श्वास घेता यावा यासाठी हवेची गुणवत्ता सुधारण्याच्या दृष्टीने तातडीने पाऊले उचलण्याची गरज आहे, असे पर्यावरण अभ्यासकांचे मत आहे.



अतिशय जुन्या व आंतरराष्ट्रीय दृष्टीने अत्यंत्य महत्वाच्या अशा लोणारमधील मंदिराला सुद्धा प्रदूषणाचा धोका असल्याची बातमी वाचण्यात आली. हे मंदिर चालुक्य काळात उभारले असून स्थापत्य कलेचा हा उत्कृष्ट नमुना आहे.

लोणार सरोवराचे पाणी खारे आहे. ज्या काळात उन्हाची तीव्रता जास्त असते, त्या काळात पाण्याचे बाष्पीभवन होऊन त्यातील खनिज मीठ हे या दैत्यसुदन मंदिरावर जमा होते. त्या मिठामुळे मंदिराचे दगड ठिसूळ होतात.

एकूणच हे मंदिर प्रदूषणापासून वाचविण्याची नितांत गरज आहे. एकूणच वाढती वाहने, वाढते शहरीकरण, वृक्षतोड यामुळे पर्यावरणाला हानी पोहोचत आहे याकडे वेळीच लक्ष देणे जरुरीचे आहे. नवीन वृक्षतोड मोठ्या प्रमाणात व्हावयास हवी. येणारा काळ हा हवेतील प्रदूषण रोखण्याचा असावा.

**- शांताराम वाघ, पुणे.**

# रेशीम उद्योग

**दुग्ध व्यवसाय आणि कुक्कुट पालन व्यवसायासारखाच रेशीम शेती व्यवसाय हा शेतीस पूरक व्यवसाय आहे. अत्यंत कमी खर्चात व शेतकऱ्याकडे उपलब्ध असलेल्या साहित्यातून हा व्यवसाय करता येतो. नवीन तुती लागवड पध्दत व नवीन पिक संगोपन पध्दतीमुळे हा व्यवसाय कमी मजूरात मोठ्या प्रमाणात करता येतो. अवघ्या १४ दिवसांत उत्पन्न देणारे रेशीम कोषाशिवाय एकही नगदी पिक नाही. या पार्श्वभूमीवर विभागातील रेशीम कोष उत्पादन आणि रेशीम उद्योगावर माहितीपर लेख...**

पट्टा पध्दतीने लागवड केल्याने तुती लागवडीपासून पाल्याच्या उत्पन्नात वाढ होते. पट्टा पध्दतीस कमी पाणी लागते. एक एकर ऊसासाठी लागणाऱ्या पाण्यात ३ एकर तुती जोपासता येते. तुतीची लागवड एकदा केल्यानंतर १५ वर्षापर्यंत जिवंत राहत असल्याने, दरवर्षी लागवड करावी लागत नाही. त्यामुळे इतर पिकांप्रमाणे वारंवार लागवडीचा खर्च येत नाही. तुतीस एप्रिल, मे या उन्हाळी महिन्यात पाणी मिळाले नाही तरी तुती मरत नाही. पाणी मिळाल्यानंतर तुती पुन्हा जोमाने वाढते. यामुळे आठमाही पाण्याची सोय असलेल्या शेतकऱ्यांनादेखील हा व्यवसाय करता येतो. रेशीम अळयांची विष्ठा दुभत्या जनावरांना सुग्रासप्रमाणे खाद्य म्हणून खायला देता येते. यामुळे जनावरांची दूधाची क्षमता वाढते. वाळलेला पाला व विष्ठेचा गोबरगॅसमध्ये उपयोग करतो येतो. तुतीच्या वाळलेल्या काडयांचा इंधन म्हणून तसेच खतनिर्मितीसाठी वापर होतो.

रेशीम संचालनालयाच्या पुणे विभागात पुणे, सांगली, सातारा, सोलापूर, कोल्हापूर, अहमदनगर, नाशिक, जळगाव, धुळे, नंदूरबार, पालघर (जव्हार) व सिंधुदुर्ग जिल्ह्यांचा सामावेश आहे. विभागात ३ हजार ४१९ शेतकऱ्यांनी ३ हजार ५६८ एकर क्षेत्रात तुतीची लागवड केली आहे. विभागात ८८ हजार ५० अंडीपुंजाचे वाटप करण्यात आले असून त्याद्वारे सुमारे ६२५ मेट्रीक टन रेशीम कोषाचे उत्पादन झाले आहे. रेशीम शेतीमुळे विभागात मोठ्या प्रमाणावर शेतकरी लक्षाधिश झाले आहेत.

पुणे विभागात सन २०२१-२२ मधे मार्च,२०२२ अखेर ९०० शेतकरी लक्षाधीश झाले असून त्यामधे पुणे जिल्ह्यातील २९३, सोलापूर जिल्ह्यातील २३१, व अहमदनगर जिल्ह्यातील १९२ शेतकऱ्यांचा समावेश आहे. शेतकऱ्यांकडे तयार होणारे कोष खरेदी-विक्रीसाठी कृषी उत्पन्न बाजार समिती, बारामती, जि. पुणे व कृषी उत्पन्न बाजार समिती, जयसिंगपूर, जि. कोल्हापूर येथे रेशीम कोष खरेदी-विक्री मार्केट स्थापन करण्यात आले आहे. कोष विक्री कोठे करावी, याचे शेतकऱ्यांवर बंधन नाही. यामुळे काही वेळा शेतकरी राज्यातील इतर मार्केट किंवा शेजारच्या राज्यातील मार्केटमधे कोषविक्री करुन चांगला फायदा कमावत आहेत.

शेतकऱ्यांना शेतमालाची योग्य किंमत मिळावी आणि शेतकरी व ग्राहक यांच्यामधील दलालांची मध्यस्थी दूर व्हावी, यासाठी केंद्र शासन ई-नाम योजना राबवित आहे. यंदा देशात प्रथमच पुणे जिल्हयातील बारामती बाजार समितीत रेशीम कोषाचा ऑनलाइन लिलाव सुरु करण्यात आला. ई-नाम योजनेअंतर्गत झालेला हा देशातील पहिलाच ऑनलाइन लिलाव आहे.

कर्नाटकातील गुलबर्गा येथील व्यापाऱ्याने २ लाख ८१ हजार रुपये किंमतीच्या एकूण ५३५ किलो रेशीम कोषांची ऑनलाइन खरेदी केली. बारामती येथे कोषांची प्रतवारी ठरविण्यासाठी बेंगळुरु येथील केंद्रिय रेशीम मंडळाकडून कोष प्रतवारी तपासणी प्रयोगशाळेसाठी भरीव तरतूद करण्यात आली असून बारामती येथे प्रयोगशाळा सुरु करण्यात आली आहे. या प्रयोगशाळेतील कर्मचाऱ्यांना कर्नाटकातील धारवाड येथे विशेष प्रशिक्षण देण्यात आले आहे.



ई-नाम योजनेत कोष खरेदी-विक्री करणारे बारामती हे फक्त राज्यातीलच नाही तर देशातील पहिलेचे मार्केट आहे. ई-नाम पद्धतीने मार्केट सुरू झाल्यापासून एका महिन्यात या केंद्रावर सुमारे ४४ लक्ष रुपये मुल्याची खरेदी-विक्री झाली आहे. आतापर्यंत पुणे, अहमदनगर, सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी येथे कोष विक्री केली आहे. ऑनलाईन पद्धतीने केलेल्या कोष विक्रीची रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट जमा होते. यासाठी कोष विक्रीसाठी मार्केटला नेतांना शेतकऱ्यांनी सोबत आधार कार्ड व बँकेच्या पहिल्या पानाची स्वच्छ झेरॉक्स प्रत सोबत घेवून जावी, असे आवाहन रेशीम संचालनालयाने केले आहे. पुणे विभागात कोल्हापूर जिल्ह्यात गडहिंग्लज येथे महाराष्ट्र शासनाचे एकमेव अंडीपुंज निर्मीती केंद्र असून संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना येथून अंडीपुंजांचा पुरवठा केला जातो. 'रेशीम उद्योजक शेतकऱ्यांना मनरेगा' तसेच 'सिल्क समग्र' या योजनेतून शासनामार्फत अनुदान देण्यात येते. शेतकऱ्यांना उद्योगाची शास्त्रीय माहिती व्हावी यासाठी वेळोवेळी संबधित जिल्हा रेशीम कार्यालयामार्फत मार्गदर्शन केले जाते. त्यासाठी मेळावे, प्रशिक्षण, अभ्यास दौरे आयोजित करुन रेशीम उद्योगाची माहिती देण्यात येते. सन २०२३-२४ या वर्षासाठी रेशीम उदयोगासाठी शेतकऱ्यांनी नोंदणी करावी यासाठी सर्व जिल्ह्यात महारेशीम अभियान राबविण्यात येणार आहे. शेतकऱ्यांनी या अभियानात सहभागी होण्यासाठी नोंदणी करावी आणि रेशीम उद्योगाचा फायदा घ्यावा, असे अवाहन पुण्याच्या प्रादेशिक रेशीम कार्यालयाच्या सहायक संचालक देशपांडे यांनी केले आहे.

**- जयंत कर्पे,
सहायक संचालक (माहिती),
विभागीय माहिती कार्यालय, पुणे**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# अक्कलकोट तालुक्यात २० ग्रामपंचायतीसाठी ७९.३० टक्के मतदान

**सुराज्य/अक्कलकोट**

**अक्कलकोट तालुक्यात ग्रामपंचायतींची सार्वत्रिक निवडणुक शांततेत पार पडून ७९.३० टक्के मतदान झाले. यात पुरूष १४२१० व स्त्री १२२८९ व इतर १ असे एकुण २६५०० मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. तालुक्यात होणाऱ्या २० ग्रामपंचायतीच्या २० थेट सरपंचपदा साठी ५३ तर १३८ सदस्यपदासाठी ३०२ उमेदवार निवडणुक रिंगणात आहेत. याआधीच एकूण दहा ग्रामपंचायत मधून ३४ सदस्यांची निवड बिनविरोध झाली.**

२० ग्रामपंचायतीसाठी पुरूष १७५८९ व स्त्री १५८२७ व इतर १ असे एकुण ३३ हजार ४१७ मतदार होते. त्यापैकी सकाळी साडेसात ते साडेनऊ या पहिल्या दोन तासात पुरूष २४७४ व स्त्री १९२७ एकुण ४४०१ असे १३.१६ टक्के मतदारांनी मतदान केले.

सकाळी साडेअकरा पर्यंत पुरूष ५८६६ व स्त्री ५३२६ व इतर १ एकुण १११९३ असे ३३. ४९ टक्के मतदारांनी मतदान केले.दीडवाजेपर्यंत पुरूष ९३५४ व स्त्री ९२०१ असे एकुण १८५५५ असे ५५.५३ टक्के मतदान झाले. साडेतीन वाजेपर्यंत पुरूष १२०७० व स्त्री ११४७३ असे एकुण २३५४३ असे ७०.४५ टक्के मतदान झाले. तर अंतिम साडेपाच वाजता एकुण पुरूष १४२१० व स्त्री १२२८९ व इतर १ असे एकुण २६५०० मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. एकुण मतदानाची टक्केवारी ७९.३० इतकी आहे.

शेवटच्या एका तासात मतदानाचा वेग वाढला. काही ठिकाणी परगांवहुन मतदार ट्रव्हल्स करून मतदानासाठी आले होते. सकाळच्या वेळेस मतदानासाठी रांगा लागल्या होत्या.राज्यातील सत्ताबदलानंतर होणाऱ्या या ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूकीला अतिशय महत्त्व आले आहे.ग्रामीण भागात चुरसपूर्ण वातावरणात उत्साहात मतदान झाले. सरपंचपदासाठी थेट मतदान होणार असल्याने निवडणुकीतील राजकीय पॅनलपेक्षा सरपंच पदाच्या निवडणुकीत चुरस पाहायला मिळाली. सर्वत्र शांततेत

## ■ ५३ सरपंच तर ३०२ सदस्य उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद



सलगर येथे ९० वर्षीय सिध्दमलय्या स्वामी याला उचलुन मतदार केंद्र येथे मतदानासाठी आणताना नातेवाईक.

चुरशीने मतदान झाले.वयोवृद्ध आजारी व्यक्तींना नातेवाईकांनी उचलुन मतदान केंद्रावर आणले तर सलगर येथे नवरदेव महेंद्र शटगार यांनी आधी मतदानाचा हक्क बजावला व अक्कलकोट येथे विवाहाला गेला.पोलीसांनी सर्वत्र कडक व चोख बंदोबस्त ठेवला होता. बोरगांव देशमुख,पालापूर, घोळसगांव, सुलतानपूर, अरळी, बोरेगांव, दर्शनाळ, दहिटणेवाडी, शिरवळवाडी, सदलापूर, शिरवळ,

> **अक्कलकोट तालुक्यात २० ग्रामपंचायतींसाठी शांततेत ७९.३० टक्के मतदान झाले. यात पुरूष १४२१० व स्त्री १२२८९ व इतर १ असे एकुण २६५०० मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला.कुठेही अनुचित प्रकार घडला नाही.**
> **- बाळासाहेब सिरसट, निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार**

कोन्हाळी, हालचिंचोळी, अंकलगे, खानापूर, रुहेवाडी, आंदेवाडी ज, हत्तीकणबस , सलगर, नाविंदगी अशा २० ग्रामपंचायतीची सार्वत्रिक निवडणुक शांततेत चुरशीने झाले.काही ठिकाणी किरकोळ बाचाबाची वगळता सर्वत्र शांततेत मतदान झाले. आधीच दहा ग्रामपंचायतीमधुन नाविंदगी १०, रुद्देवाडी ०२, सलगर ०१, अंकलगी ०३,खानापूर०३, कोन्हाळी ०१, शिरवळ०८, शिरवळवाडी ०१, दर्शनाळ ०४, घोळसगाव ०१ असे ३४ सदस्य यांची निवड बिनविरोध झाली असुन उर्वरित सदस्यांचा भविष्य मतपेटीत बंद झाले असुन मंगळवार २० डिसेंबर रोजी मतमोजणी आहे.तालुक्यातील सलगर, बोरगांव दे, हत्तीकणबस, घोळसगांव, दर्शनाळ, दहिटणेवाडी, कोन्हाळी, खानापूर, रूद्देवाडी, नाविंदगी येथे चुरशीने मतदान झाले तर शिरवळ येथे कमी मतदान झाले.हत्तीकणबस येथे तीन मतदान केंद्रावर साडेतीन वाजेपर्यंत सुमारे ८० टक्के मतदान झाले. विद्यमान सरपंच श्रीशैल नंदर्गी विरूद्ध श्रीशैल माळी यांच्यात चुरशीने लढत होत आहे व अपक्ष शंकर माळी हेही नशीब आजमावत आहेत.

सलगर येथे दुपारी चार वाजेपर्यंत ८० टक्के पेक्षा शांततेत चुरशीने मतदान झाले.सलगर येथे ९० वर्षीय सिध्दमलय्या स्वामी याला उचलुन मतदार केंद्र येथे मतदानासाठी नातेवाईक यांनी आणले. सलगर येथील नवरदेव महेंद्र शटगार यांने प्रथम मतदानाचा हक्क बजावला व नंतरच विवाहाच्या बोहल्यावर चढला.

# दक्षिण सोलापूर तालुक्यात रात्री उशिरापर्यंत चुरशीने ८० टक्के मतदान

## निकालाकडे तालुक्यातील ग्रामस्थांचे लक्ष

**सुराज्य/दक्षिण सोलापूर**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रूप, निंबर्गी, वांगी, विंचूर, कंदलगाव, होनमुर्गी, बसवनगर व औज (मंद्रूप) येथील ग्रामपंचायत निवडणूक मतदान रात्री उशिरापर्यंत सुरू होते. चुरशीने मतदान झाल्यामुळे मतदानाची टक्केवारी वाढली आहे त्यामुळे निकालाकडे सर्वांच्या नजरा लागले आहेत. या निवडणूकीत आमदार सुभाष देशमुख, जिल्हा बँकेचे माजी संचालक सुरेश हसापुरे , माजी कृषी सभापती अप्पाराव कोरे, माजी सभापती गुरूनाथ म्हेत्रे यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील मध्यवर्ती केंद्र असणारे मंद्रूपमध्ये ग्रामपंचायत निवडणुक सर्वच राजकीय पक्षांनी प्रतिष्ठेची केली होती. आमदार सुभाष देशमुख यांच्यासाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची होती तर लोकनेते कै. गोपाळराव कोरे शिवाय ही यंदा निवडणूक प्रथमच होत असल्यामुळे त्यांच्याही अस्तित्वाची होती . आरके फाउंडेशनचे मोतीलाल राठोड यांनीही नशीब आजमावत निवडणूक चुरशीची



केली होती. त्यामुळे निकाल कोणाच्या बाजूने लागणार? हे सांगणे कठीण आहे. मात्र मतदानाची टक्केवारी वाढल्यामुळे धक्कादायक निकाल लागण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. मंद्रूप मध्ये रात्री साडेसात वाजेपर्यंत मतदान प्रक्रिया सुरू होते.

वार्ड क्रमांक एक, वार्ड क्रमांक तीन व वार्ड क्रमांक सहा मध्ये मतदार रात्रीपर्यंत थांबून होते. त्यामुळे मतदानाची टक्केवारी वाढली आहे . सर्वच उमेदवारांनी ही निवडणूक चुरशीची केल्यामुळे मंद्रुप मधे ७५ टक्के पर्यंत मतदान झाले आहे. मंद्रूप मध्ये ११ हजार ९३२.पैकी ८ हजार ९३४ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. त्यामुळे मतदारांनी अनिता कोरे, प्रभावती हेळकर व शितल राठोड यांचे नशीब मतपेटीत बंद केले आहे. निंबर्गी येथील ग्रामपंचायत निवडणूक ही भाजपाचे आमदार सुभाष देशमुख व जिल्हा बँकेचे माजी संचालक सुरेश हसापुरे यांच्या गटात होती. निंबर्गीमध्ये सुरेश हसापुरे यांच्या अस्तित्वाची तर आमदार देशमुख यांच्या प्रतिष्ठेची होती. या ठिकाणी सुरेश हसापुरे यांनी आपले चिरंजिव श्रीदीप हसापुरे यांच्या विजयासाठी प्रतिष्ठा पणाला लावली होती. निंबर्गीमध्ये ७७ टक्के मतदारांनी मतदानाचे हक्क बजावले . कंदलगावमध्ये चुरशीने ७८ टक्के मतदान झाले. होनमुर्गी येथे आमदार देशमुख यांचे समर्थक गुरुनाथ तेली व भीमाशंकर नरसगोंडे यांच्या गटामध्ये दुरंगी लढत होती. या ठिकाणीही भाजपच्या दोन्ही गटांमध्ये सरळ लढत असल्यामुळे ८० टक्के मतदान झाल्याने निकालाकडे लक्ष लागले आहे . बसवनगर येथे दुरंगी लढत असून याठीकाणी ८९ टक्के मतदान झाले. वांगी येथे ८० टक्के मतदान झाले आहे विंचुर शंकरनगर येथे ८९ टक्के मतदान झाले. औज (मंद्रुप) येथे चुरशीने ८० टक्के मतदान झाल्याने सरपंच कोण होणार? याकडे नजरा लागले आहेत.

# वेळापूर ग्रामपंचायतीसाठी ७२.६० टक्के मतदान

## वेळापूर परिसरातील सर्व ग्रामपंचायतीसाठी शांततेत मतदान

**सुराज्य/वेळापूर**

वेळापूर येथील ग्रामपंचायतीसाठी सुमारे ७२.६० टक्के मतदान झाले असून सरपंचपदासाठी तिरंगी लढत झाली आहे. वेळापूर ग्रामपंचायतीची लोकसंख्या सुमारे २५ हजार असून एकूण मतदान १२६८६ इतके आहे. रविवारी सकाळी साडेसात वाजता मतदानाला सुरुवात झाली. उत्तम जानकर यांच्या विरुध्द मोहिते पाटील गट अशी दुरंगी लढत असली तरी तिसऱ्या आघाडीनेही सर्व ठिकाणी उमेदवार उभे केले होते.

सरपंचपदासाठी सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसकडून रजनीश बनसोडे, मोहिते पाटील गटाकडून भारत बनसोडे तर तिसऱ्या आघाडी कडून माया उर्फ सदाशिव साठे या तृतीयपंथी उमेदवारामध्ये लढत झाली आहे. प्रभाग क्रमांक १ मध्ये १९९२ पैकी १५०५, प्रभाग क्रमांक २ मध्ये २२५० पैकी १९९६, प्रभाग क्रमांक ३ मध्ये २९९५ पैकी २०३४, प्रभाग क्रमांक ४ मध्ये २२०० पैकी १७२७, प्रभाग क्रमांक ५ मध्ये १७९५ पैकी १२४० तर प्रभाग क्रमांक ६ मध्ये १५५४ पैकी १०६५ मतदान झाले आहे . १२६८६ पैकी ९३६७ मतदान झाले आहे. एकूण मतदानाच्या ७२.६० टक्के चुरशीने मतदान झाल्याने उत्तम जानकरांच्या १५ वर्षाच्या काळात केलेली कामांच्या जोरावर त्यांना नागरीक पुन्हा संधी देणार की ग्रामपंचायतीमध्ये परिवर्तन पॅनलला संधी मिळणार या कडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मंगळवारी माळशिरस येथे मतमोजणी नंतरच निकालाचे चित्र स्पष्ट होणार आहे.



तसेच फळवणी ग्रामपंचायत निवडणुकीत ८६ टक्के, कोळगाव ग्रामपंचायत निवडणूक ७८.६९ टक्के, निमगाव ग्रामपंचायत ८७.५५ टक्के, खंडाळी ग्रामपंचायत ८३.०६ टक्के, उघडेवाडी ग्रामपंचायत निवडणुकीत ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य बिनविरोध निवडून आले आहेत, पण सरपंच पदासाठी निवडणूक लागली होती त्यामध्ये ६८.४७ टक्के मतदान झाले आहे. तसेच पिसेवाडी ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये ८४.६० टक्के मतदान झाले आहे. वेळापूर पोलीस स्टेशनच्या अंतर्गत असणाऱ्या ग्रामपंचायत निवडणुकीत गावांमध्ये मतदान शांततेत व्हावे यासाठी वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी निलेश बागाव यांनी बंदोबस्त चोख ठेवला होता तर निवडणुकीच्या आदल्या दिवशी प्रत्येक गावात रूट मार्च काढून मतदार राजांनी निर्भयपणे मतदान करावे त्यांना कोणती भीती वाटू नये म्हणून पोलिसांचा रूट मार्च काढला होता. तसेच पूर्व भागातील जांभूड ग्रामपंचायत निवडणुकीत ८२.०० टक्के, माळेवाडी बोरगाव ग्रामपंचायत निवडणुकीत ८४.७५ टक्के मतदान झाले आहे तर नेवरे ग्रामपंचायत निवडणुही सरपंच पद व सदस्य हे सर्व बिनविरोध निवड झालेली आहे.

## माळखांबीत कोयता-काठीने मारहाण; वृद्ध इसम आणि मुलगा जखमी

**सोलापूर** : आमच्या शेतात असलेल्या बांधावरची झाडे तोडू नका. असे सांगितल्याच्या कारणावरून कोयता आणि काठीने केलेल्या मारहाणीत वृद्ध इसम आणि त्यांचा मुलगा असे दोघेजण जखमी झाले. ही घटना माळखांबी (ता. माळशिरस) येथे शनिवारी दुपारच्या सुमारास घडली. रामदास नारायण चव्हाण (वय ६३) आणि त्यांचा मुलगा रणजीत चव्हाण अशी जखमींची नावे आहेत. त्यांना विजयकुमार आदिनाथ पवार आणि त्याचा मुलगा गणेश पवार या दोघांनी मारहाण केली. या संदर्भात जखमी रामदास चव्हाण यांनी अकलूज पोलिसात फिर्याद दाखल केली.पवार पितापुत्र हे दोघे मिळून आपल्या बांधावरचे झाडे तोडत होते.झाडे तोडू नका असे सांगितल्यानंतर त्यांनी मारहाण केली.अशी नोंद पोलिसात झाली. पुढील तपास हवालदार चंदनशिवे करीत आहेत.

## अनोळखी वाहनाच्या धडकेने सायकल वरील इसम ठार

**सोलापूर** : सायकल वरून घराकडे जाताना अनोळखी वाहनाच्या धडकेने ५५ वर्षीय इसम जखमी होऊन उपचारा दरम्यान मरण पावले मरण पावले. हा अपघात हैद्राबाद रोडवरील चाचा हॉटेल जवळ शनिवारी रात्रीच्या सुमारास घडला. दत्तात्रय नारायण परकीपल्ली (वय ५५ रा. घरकुल कुंभारी ,ता.दक्षिण सोलापूर) असे मयताचे नाव आहे. ते काल रात्री १० वाजेच्या सुमारास कन्ना चौकातून आपल्या घराकडे सायकलवरून निघाले होते. चाचा हॉटेल जवळ अनोळखी वाहनाने धडक दिल्याने ते बेशुद्ध झाले होते. त्यांना उपचारासाठी लिंगप्पा अरकाल (जावई) यांनी बेशुद्ध अवस्थेत शासकीय रुग्णालयात दाखल केले होते.उपचारादरम्यान ते रविवारी सकाळी मरण पावले. या अपघाताची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली आहे.

## पाय घसरून पडल्याने महिलेचा मृत्यू

**सोलापूर** : अंघोळीसाठी बाथरूम मध्ये जात असताना पाय घसरून पडल्याने ५९ वर्षीय महिला जखमी होऊन मरण पावली. ही घटना जुना देगाव नाका परिसरातील साठे पाटील वस्तीत रविवारी सकाळच्या सुमारास घडली. मारेम्मा सिद्धप्पा शेवलोलू (वय ५० रा. साठेपाटील वस्ती) असे मयत झालेल्या महिलेचे नाव आहे. त्या आज सकाळी ६ वाजेच्या सुमारास बाथरूम मध्ये जात होत्या. त्यावेळी पाय घसरून पडल्याने डोक्यास मार लागून त्या जखमी झाल्या होत्या. त्यांना शासकीय रुग्णालयात दाखल केले असता त्या उपचारापूर्वीच मयत झाल्या. या घटनेची नोंद सलगरवस्ती पोलिसात झाली आहे.

## इचगाव टोलनाक्याजवळ कोयत्याने मारहाण; कर्मचारी जखमी

**सोलापूर** : वाहन का सोडले नाही? या कारणावरून कोयता आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणी टोल नाक्यावरील कर्मचारी जखमी झाला. ही घटना मंगळवेढा रोडवरील इचगाव टोळ नाका येथे शनिवारी रात्रीच्या सुमारास घडली. अझरोद्दीन रसूल फुलारी (वय २६ रा. बेगमपूर, ता.मोहोळ) असे जखमी झालेल्या कर्मचाऱ्यांचे नाव आहे. त्याला कामती येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. असलम गफूर चौधरी, जाकिर चौधरी, आसिफ पठाण, सरफराज तांबे याच्यासह १० ते १५ लोकांनी मारहाण केली अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## अक्कलकोट स्टेशनजवळ रिक्षा चालकास मारहाण

**सोलापूर** : अक्कलकोट रेल्वे स्थानकाजवळ रिक्षात प्रवासी बसविण्याच्या कारणावरून झालेल्या भांडणात केलेल्या मारहाणीत अरुण देविदास राठोड (वय ३५ रा. शिवाजीनगर अक्कलकोट) हा जखमी झाला. त्याला अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करून शांताबाई (आई) यांती शासकिय रुग्णालयात दाखल केले. दादू चव्हाण आणि युवराज चव्हाण या दोघांनी शनिवारी सायंकाळी त्याला मारहाण केली. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

# उत्तरमधील १२ ग्रामपंचायतमध्ये सरासरी ८२ टक्के मतदान

## सर्वात जास्त कौठाळीत मतदान

**सुराज्य/उत्तर सोलापूर**

उत्तर तालुक्यातील १२ ग्रामपंचायतमध्ये सरपंच व सदस्य पदासाठी सरासरी ८२% मतदान कोणत्याही झाले असल्याचे उतर तहसीलदार कार्यालयाच्या वतीने सांगण्यात आले आहे. कौठाळी ९६% व कमी मतदान मार्डी मध्ये ७६% झाले आहे. कंसात मतदानाची टककेवारी



पुढील प्रमाणे - अकोलेकाटी-२६२३/२०९० (७९.६७,%), दारफळ गावडी-२३३०/२२०७ (९४.७२%), डोनगाव/ भाटेवडी- ३२३६/२३२० (७२%) कारंबा-२३३०/२२०७ (८२.७१%), कवठे - २६०३/१९८८ (७६.७७%), कौठाळी -२५०१/२४०३ (९६.३०%), मार्डी-५२९२/३९२४(७४.३२%), नंदुर/समशापुर - १३९३/११०९ (७९.४५%), नरोटेवाडी -१०८०/ ९६५(८९.३५%), पाकणी-२७०३/२२४८ (८०.३५%), राणमसले - ३०२५/२३२२ (७६.७६%), शिवणी-८९३/७७२ (८६.४५%) असे एकूण सरपंच व सदस्य पदासाठी ८२% मतदान झाले आहे. मतमोजणी सकाळी ८ वाजल्यापासून होणार आहे.

# मोहोळ तालुक्यातील ९ गावांच्या ग्रामपंचायतीसाठी १३९०१ मतदान

**सुराज्य/मोहोळ**

तालुक्यातील ९ गावच्या ग्रामपंचायतीसाठी १६५१६ पैकी १३९०१ जणांनी मतदान केले. ही सरासरी ८४.१७ टक्के आहे. अर्धनारी ही ग्रामपंचायत या आधीच बिनविरोध झाली आहे. सकाळी मोठी गर्दी करीत अगदी दुपारी दीड वाजेपर्यंत अत्यंत चुरशीने झालेले मतदान ५२ टक्के झाले होते.

नंतर मतदानाचा वेग वाढला आणि मतदानासाठी रांगा ही लागल्या. ९ ग्रामपंचायती मध्ये अत्यंत चुरशीने मतदान सुरु होते अगदी सुरवाती पासुन दोन्ही पॅनल आपले आपले मतदार आणून मतदान करवून घेत होते.




**तालुक्यातील निवडणूका असलेल्या गावांची नांवे आणि मतदान व त्यांची टक्केवारी याप्रमाणे**

- कामती बु - २८९७ पैकी २५६४ मतदान झाले.(८८.३६%)
- यावली २९९९ पैकी २२६३ मतदान झाले (७५.४६%)
- डिकसळ - येथे एका जागेसाठी १६४८ पैकी ११९२ मतदान झाले (७२.३३% )
- वाफळे - ३०३४ पैकी २६०६ मतदान झाले (८५.८९%)
- सारोळे - १२३७ पैकी ११०४ मतदान झाले (८९.२५%)
- मोरवंची - एकूण ११७८ पैकी ९६५ मतदान झाले (८१.८२%)
- अरबळी - एकुण ७७२ पैकी ६३९ मतदान झाले (८२.७७%)
- बैरागवाडी - एकूण १७५८ पैकी मतदान १६३५ झाले (९३%)
- कुरणवाडी - एकुण ९९३ पैकी ९३३ मतदान झाले (९३.९६%)

**हे सर्व मतदान आगदी शांततेत पार पडले. पोलिसानी बंदोबस्त चोख ठेवला होता**

## काळमवाडी, चांदापुरी व पठाणवस्ती ग्रामपंचायतसाठी मतदान शांततेत

**सुराज्य/पिलीव**

माळशिरस तालुक्यातील काळमवाडी ग्रामपंचायतीच्या पंचवार्षिक निवडणुकीत १३५२ पैकी ११९९ मतदारांनी मतदानाचा हक्क बजाविला याठिकाणी ८८.६८ टक्के मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजाविला याठिकाणी दोन शिंगाडे बंधुमध्ये सरपंच पदासाठी लढत आहे. यामध्ये दादासाहेब शिंगाडे व भुजंगराव शिंगाडे या दोघांमध्ये सरपंच पदासाठी लढत आहे.


मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली. चांदापुरी ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत १८२३ पैकी १६१६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजाविला याठिकाणी ८८.६० टक्के मतदान झाले. याठिकाणी सरपंच पदासाठी दोन सुळ बंधुमध्ये लक्षवेधी लढत आहे. यामध्ये या अगोदर सत्तेत असणाऱ्या पार्टीकडुन भगवान सुळ तर विरोधी गटाकडुन जयवंत सुळ हे सरपंच पदासाठी लढत आहेत.

# — सांगोला तालुक्यातील ५ ग्रामपंचायतीत ७३ टक्के मतदान —

**सुराज्य/सांगोला**

तालुक्यातील पाच ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत २१ मतदान केंद्रावर ५ हजार ५७८ स्त्री मतदारांनी तर ६ हजार १५९ पुरुष मतदारांनी एकूण ११ हजार ७३% मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला असून एकूण ८२.६३ टक्के शांततेने मतदान झाले.

बलवडी येथे अकरा सदस्य बिनविरोध निवडून आल्याने सरपंच पदासाठी १



हजार २४८ स्त्री तर १ हजार ४३९ पुरुष व एकूण २ हजार ६८७ मतदारांनी मतदान केले एकूण ७६.२३ टक्के मतदान झाले. चिंचोली ग्रामपंचायत मध्ये ११ जागेसाठी १ हजार २३८ स्त्री व १ हजार ३८९ पुरुष असे २ हजार ६२% मतदारांनी मतदान केले एकूण ८७.१३ टक्के मतदान झाले. शिवने ग्रामपंचायत मध्ये ११ जागेसाठी १ हजार ४०५ स्त्री व १ हजार ५५७ पुरुष असे २ हजार ९६२ मतदारांनी मतदान केले एकूण ८९.७३ टक्के मतदान झाले. चिनके ग्रामपंचायत मध्ये सरपंच पदाची निवड बिनविरोध झाली होती. ११ सदस्य पदासाठी १०६६ स्त्री तर १०९१ पुरुष असे २ हजार १५७ मतदारांनी मतदान केले एकूण ८१.४६ टक्के मतदान झाले. अनकढाळ ग्रामपंचायत मध्ये नऊ जागा असून तीन जागेवर बिनविरोध निवड झाली होती उर्वरित सहा जागेसाठी ६२१ स्त्री तर ६८३ पुरुष असे १ हजार ३०४ मतदारांनी मतदान केले एकूण ७५.९९ टक्के टक्के मतदान झाले. पाच ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत सर्वच पॅनेल प्रमुखांनी व कार्यकर्त्यांनी मतदारांना आणून मतदान करून घेतले जात होते मतदारात उत्साह कमी दिसून येत होता.

परंतु नेत्यांनी घरी जाऊन मतदारांना प्रवृत्त केल्याने ८२.८३ टक्के मतदान झाले किरकोळ शिवीगाळ प्रकरण सोडले तर कोठेही अनुचित प्रकार घडला नाही सर्वत्र शांततेने मतदान पार पडले मतमोजणी मंगळवार वीस डिसेंबर रोजी सकाळी नऊ वाजता सुरू होणार आहे सरपंच निवडणूक प्रत्यक्ष मतदारातून असल्याने उमेदवारांचे निकालाकडे लक्ष लागले आहे तर कार्यकर्त्यांनी त्यासाठी मोठ्या पैजा लावल्या आहेत.

# नागरिकांनी समाजभान विसरणे हा देशाच्या प्रगतीतील अडथळा : डॉ.पिंगळे

## शेठ लोणकरणजी चंडक स्मृती व्याख्यानमाला

**सोलापूर** : समाजाचा अंकुश नसल्यानेच राजकारण आणि प्रशासनातील नैतिकतेचा स्तर खालावला आहे. नागरिकांनी समाजभान विसरणे हा देशाच्या प्रगतीतील मोठा अडथळा आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे चे कार्यवाह डॉ. वि. दा. पिंगळे यांनी केले.

महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा सोलापूर आणि शेठ लोणकरणजी




जगन्नाथजी चंडक ट्रस्ट आयोजित शेठ लोणकरणजी जगन्नाथजी चंडक स्मृती व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प रविवारी डॉ. वि. दा. पिंगळे यांनी 'आम्ही समाजभान का विसरतो आहोत ?' या विषयावर गुंफले.याप्रसंगी व्यासपीठावर मसाप सोलापूरच्या अध्यक्षा डॉ. श्रुतीश्री वडगबाळकर, लोणकरणजी जगन्नाथजी चंडक चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव डॉ. गिरीष चंडक, कार्याध्यक्ष किशोर चंडक, मसापचे कार्यवाह राजेंद्र भोसले उपस्थित होते.हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या ॲम्फी थिएटरमध्ये ही व्याख्यानमाला सुरु असून यंदाचे २६ वे वर्ष आहे.

डॉ. पिंगळे म्हणाले, आर्थिक सुबत्तेपेक्षा समाजात चांगला विचार देणारी किती माणसे आहेत यावर देशाचे मूल्य ठरते. आपण ज्या समाजात राहतो त्या समाजाचे अन् देशाचे भले करण्याची नैतिक जबाबदारी माझी आहे असे वाटणे म्हणजे समाजभान आहे. मसापच्या अध्यक्षा डॉ. श्रुतीश्री वडगबाळकर यांनी प्रास्ताविक केले. राजेंद्र भोसले यांनी सूत्रसंचालन तर देविदास गुरव यांनी आभार प्रदर्शन केले.

याप्रसंगी मसापचे समन्वयक ॲड जे. जे. कुलकर्णी, श्रुती चंडक, चंडक ट्रस्टचे कालिदास जाजू, कोषाध्यक्ष प्रा. डॉ. नरेंद्र काटीकर, गोविंद काळे, डॉ. अर्जुन व्हटकर, गिरीष दुनाखे, पद्माकर कुलकर्णी, फय्याज शेख, वंदना कुलकर्णी उपस्थित होते.

### मारुती चित्तमपल्ली यांचा आज सत्कार

वन्यजीव अभ्यासक, जेष्ठ साहित्यिक मारुती चित्तमपल्ली यांनी वयाची ९० वर्षे पूर्ण केल्याबद्दल महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा सोलापूर आणि शेठ लोणकरणजी जगन्नाथजी चंडक ट्रस्टतर्फे सोमवारी सायंकाळी ६ वाजता हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या म्फी थिएटरमध्ये त्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. यावेळी सोलापूरकरांनी उपस्थित रहावे असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

# वीजबिल वसुलीसाठी व वीजचोरीवर कारवाई करण्यासाठी तीव्र मोहीम सुरू : पवार


## ▸ डिसेंबरमध्ये शेतीपंपासाठी १ हजार वीज कनेक्शन देणार
## ▸ शेतकऱ्यांनी शेतीपंप वीज कनेक्शनसाठी अर्ज करावेत

येत्या डिसेंबर महिन्यामध्ये सांगोला तालुक्यात १ हजार शेतीपंपांना वीज कनेक्शन जोडणी करण्याचे महावितरणचे उद्दिष्ट आहे. ज्या शेतकऱ्यांना शेतीपंपाला वीज कनेक्शन जोडणी करायची आहे, अशा शेतकऱ्यांनी आवश्यक त्या कागदपत्राची पूर्तता करून ऑनलाईन अर्ज सादर करावेत. चार पोलच्या आतील वीज कनेक्शन देण्यासाठी निधी उपलब्ध झाल्यास तातडीने सदर वीजपुरवठा सुरळीत सुरू केला जाणार आहे.

**- आनंद पवार, उपकार्यकारी अभियंता.**

✔ सुराज्य/सांगोला

**वीजबिल थकबाकी वसुलीसाठी व वीजचोरीला आळा बसवण्यासाठी कार्यालयीन टीम कार्यान्वीत करण्यात आली आहे. घरगुती, औद्योगिक व शेतीपंप वीज ग्राहकांकडे थकबाकी आहे, अशा ग्राहकांनी थकबाकी न भरल्यास त्या ग्राहकांचा विद्युत पुरवठा खंडीत करण्याची कारवाई केली जाणार आहे, असा इशारा सांगोला महावितरणचे उपकार्यकारी अभियंता आनंद पवार यांनी दिला आहे.**



सांगोला तालुक्यात घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक असे एकूण ४५ हजार वीज ग्राहक आहेत. तर शेतीपंपाचे एकूण ३५ हजार वीज ग्राहक आहेत. घरगुती व्यवसायिक व औद्योगिक वीज ग्राहकांकडे थकबाकी पोटी २ कोटी ६२ लाख रूपये थकबाकी आहे.

शेतीपंपाचे एकूण ४५० कोटी रुपये थकबाकी आहे. ही बाकी वसूल करण्यासाठी वरिष्ठांच्या आदेशानुसार कार्यालयाकडून प्रयत्न केले जात आहे. थकबाकी मोहिमेतंर्गत सदरची वसुली करण्यासाठी ९ शाखा कार्यालय अंतर्गत अधिकारी व कर्मचारी यांच्या माध्यमातून ही वसुली केली जाणार आहे.

सध्या वसुली करण्यासाठी गावपातळीवर कार्यालयीन टीम कार्यान्वीत करण्यात आली आहे. ज्या ग्राहकांकडे थकबाकी आहे, अशा ग्राहकांनी थकबाकी न भरल्यास त्या ग्राहकांचा जागेवर विद्युत पुरवठा खंडीत करण्याची कारवाई केली जात आहे. वरिष्ठांच्या आदेशानुसार सांगोला शहर आणि तालुक्यातील थकबाकीदार वीज ग्राहकांच्या थकबाकी वसुलीसाठी वसुली पथकाची निर्मिती करण्यात आली आहे.

थकबाकी वसुली मोहिमेतंर्गत सांगोला वीजवितरण कार्यालयाकडून वीजबिल वसुली मोहिमेला व विद्युत पुरवठा खंडीत करण्याच्या कारवाईला धुमधडाक्यात शुभारंभ केला आहे.

ज्या वीज ग्राहकांकडे थकबाकी आहे अशा वीज ग्राहकांचा विद्युत पुरवठा खंडित करण्याची कार्यवाही केली जाणार आहे. विशेष टीमद्वारे विद्युत पुरवठा खंडीत करणे व वसुली करणे ही मोहिम राबविण्यात येणार आहे. वीज ग्राहकांनी आपला थकीत व चालू वीज बिल भरावे आणि कारवाईपासून बचाव करावा, असे आवाहन कार्यकारी उपअभियंता आनंद पवार यांनी केले आहे.



## ‘विराटपूर विरागी’ चित्रपटाच्या प्रचारार्थ भव्य रथयात्रा

✔ **सुराज्य/अक्कलकोट** : बहुचर्चित हानगलश्री कुमार शिवयोगी यांच्या जीवनपटावर आधारित ‘विराटपूर विरागी’ या कन्नड चित्रपटाच्या प्रचारार्थ, मंगळवार दि. २० डिसेंबर २०२२ रोजी महाराष्ट्र व कर्नाटक राज्यातील वेगवेगळया ठिकाणाहून एकाच वेळी, सहा रथयात्रा निघणार असून दि.१ जानेवारी रोजी गदग (कर्नाटक) येथे सांगता होणार आहे.

सतत १३ दिवस चालणाऱ्या या रथयात्रेचे, ७००० कि.मी. चे अंतर, ३६० उद्बोधन सभा, अंदाजे १ कोटीहून अधिक लोकांची व्याप्ती ही ठळक वैशिष्टये असणार आहेत. त्यामुळे ही रथयात्रा निश्चितच ऐतिहासिक ठरणार आहे. नियोजित ‘सोलापूर-गदग रथयात्रा’ मंगळवार, दि. २० डिसेंबर रोजी अक्कलकोट येथे पोहोचणार आहे. त्यानिमित वटवृक्ष श्री स्वामी महाराज देवस्थान अक्कलकोट येथून सांय.५:३० वा. मेनरोड मार्गे भव्य शोभायात्रा निघणार असून याची सांगता ग्रामदैवत श्री मल्लिकार्जून मंदिर, अक्कलकोट येथे सांय ६:३०वा. उद्बोधन सभेने होणार आहे. या चित्रपटाचे निर्देशन राष्ट्रीय पुरस्कार विजेते ख्यातनाम दिग्दर्शक बी. एस. लिंगदेवरु यांनी केलेली आहे. यावेळी दहिटणे मठाचे पूज्य मृगेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक व स्वागत स्वामीनाथ हरवाकर यांनी केले तर आभार बाळकृष्ण म्हेत्रे यांनी मानले. पत्रकार परिषदेस समाधान मेळाचे कार्यकारी अध्यक्ष बसवराज माशाळे, सचिव नगरसेवक कांतु धनशेट्टी, सुरेश पाटील, शिवकुमार कापसे, सागर हळगोदे, प्रमोद लोकापुरे, राजू थंब, ओंकार लोकापुरे आदी मान्यवर उपस्थित होते.



## आपुलकी प्रतिष्ठानच्यावतीने ऊस तोडणी कामगारांना ब्लँकेट वाटप

✔ **सुराज्य/सांगोला** : आपुलकी प्रतिष्ठानच्यावतीने ऊस तोडणी मजुरांना ब्लँकेट वाटप करण्यात आले. सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या आपुलकी प्रतिष्ठान सांगोला या संस्थेच्या वतीने दरवर्षी ब्लँकेट वाटपाचा कार्यक्रम केला जातो. यावर्षी बीड जिल्ह्यातील गेवराई आणि धारूर या ठिकाणाहून केदार मळा वासूद येथे ऊस तोडणीसाठी आलेल्या ऊस तोडणी मजुरांना ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. त्याचबरोबर शनी गल्ली येथे राहणाऱ्या चव्हाण कुटुंबीयांनाही ब्लँकेट देण्यात आले.थंडीत ऊस तोडणीचे काम करणाऱ्या ऊस तोडणी मजुरांची संख्या भरपूर आहे. कडाक्याच्या थंडीत काम करणारे मजूर सध्या सांगोला तालुक्यात मोठ्या प्रमाणात आलेले आहेत. त्यांच्यापैकीच काही कुटुंबाला ब्लँकेट देऊन आपुलकीने मायेची ऊब देण्याचे काम केले आहे.यावेळी आपुलकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र यादव, सचिव संतोष महिमकर, सहसचिव शरणप्पा हळळीसागर, अरविंद केदार, महादेव दिवटे, हरिभाऊ जगताप गुरुजी, निलकंठ लिंगे, सुरेशकाका चौगुले, दादा खडतरे, इंजि. विकास देशपांडे, संजय गव्हाणे, अशोक भोसले, संजय केदार आदी उपस्थित होते.

## दुहेरी जलवाहिनीचे काम तत्काळ सुरू करा : आ. प्रणिती शिंदे

✔ सुराज्य/सोलापूर



सोलापूर शहराच्या पाणी पुरवठ्याकरिता आवश्यक असलेले उजनी ते सोलापूर समांतर जलवाहिनीचे काम थांबविले आहे. समांतर जलवाहिनीचा प्रकल्प सोलापूरशहरवासियांकरिता अत्यंत महत्वाचा असून तो तातडीने पूर्ण केला पाहिजे. हे काम सुरू करावे, अशी मागणी आ. प्रणिती शिंदे यांनी स्मार्ट सिटी कंपनीचे चेअरमन, मुख्य कार्यकारी अधिकारी, आयुक्तांकडे केली आहे.

या जलवाहिनीचे काम थांबविण्याकरीता कोणत्याही न्यायालयाने स्थगिती अथवा सूचना दिलेल्या नसल्याबाबतची माहिती समोर येत आहे. त्यामुळे हे काम थांबविण्याची गरज नसताना देखील वेळकाढूपणा चालू आहे. काम थांबविणे म्हणजे शहराच्या विकासकामांमध्ये अडथळा आणला जात आहे. जलवाहिनीचे थांबविलेले काम तात्काळ चालू करण्यात यावे अथवा कोणत्या वैध कारणामुळे स्मार्ट सिटी कंपनीने सदरचे काम थांबविलेले याचा खुलासा होणे गरजेचे आहे, असे आ. शिंदे यांनी म्हटले आहे.

## कवी माधव पवार गदिमा काव्यप्रतिभा पुरस्काराने सन्मानित

✔ सुराज्य/सोलापूर



मराठी शारदेचे लेणे आणि महाराष्ट्राच्या हृदयाचे गाणे म्हणजेच गदिमा, गदिमा म्हणजे कवितेचे कल्पतरू असून आजचे कवी हे ग. दि. माडगूळकरांचे वंशज आहेत, असे प्रतिपादन संगीतकार आनंद माडगूळकर यांनी केले.

महाराष्ट्र कामगार साहित्य परिषदेच्यावतीने ग. दि. माडगूळकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या पुण्याच्या वाकडेवाडी येथील पंचवटी निवासस्थानी गदिमा यांच्या आठवणी जागवल्या. याप्रसंगी सोलापूरचे ज्येष्ठ कवी माधव पवार यांना गदिमा काव्यप्रतिभा पुरस्कार ग. दि. माडगूळकर यांच्या सूनबाई शीतल माडगूळकर यांच्या हस्ते सन्मानपूर्वक देण्यात आला, त्यावेळी आनंद माडगूळकर बोलत होते.

सत्काराला उत्तर देताना सोलापूरचे ज्येष्ठ कवी माधव पवार यांनी आपण हा पुरस्कार अत्यंत सन्मानपूर्वक स्विकारत असल्याचे सांगून. त्यांच्या नावाने दिला जाणारा पुरस्कार त्यांच्या वारसदारांकडून मिळणे हे भाग्याचे आहे. तरी आपल्या कवितांच्या सादरीकरण केले. या पुरस्कार वितरणानंतर कवी संमेलनाची सुरुवात गदिमा यांच्या पंचवटी निवासस्थानी असलेल्या पुतळयाला पुष्पहार अर्पण करून गदिमाची नात लीनता माडगूळकर करण्यात आली. आनंद माडगूळकर म्हणाले की, ‘उत्तम कवी होण्यासाठी ओवी करायला शिकले पाहिजे. त्यासाठी काव्यरचना निर्दोष असावी लागते.’

याप्रसंगी सोलापूरचे ज्येष्ठ कवी माधव पवार यांना गदिमा काव्य प्रतिभा आणि पुण्याचे ज्येष्ठ कवी उद्धव कानडे यांना गदिमा स्नेहबंध पुरस्कार देऊन शीतल माडगूळकर आणि आनंद माडगूळकर यांच्या हस्ते समारंभपूर्वक देण्यात आला. संगीता झिंजुरके, मानसी चिटणीस, राजेंद्र वाघ, वर्षा बालगोपाल, यांनी गदिमांच्या कविता सादर केल्या.

महाराष्ट्र कामगार साहित्य परिषदेचे अध्यक्ष पुरुषोत्तम सदाफुले यांनी गदिमा काव्य महोत्सवाचा आढावा घेतला सुरेश कंक यांनी सूत्रसंचालन केले तर मुरलीधर दळवी यांनी आभार मानले.

## गरीब विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठी २० लाखांची तरतूद : स्वामी

✔ सुराज्य/सोलापूर

विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी, त्यांच्या शिष्यवृत्तीसाठी जि.प.सेसमधून २० लाखांची तरतूद करणेत आली असल्याची माहिती जि. प. चे मुख्य कार्य. अधिकारी दिलीप स्वामी यांनी दिली.

जिल्हा परिषदेच्या शिवरत्न सभागृहात शिक्षण विभागाच्यावतीने बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस अतिरिक्त मुख्य कार्य. अधिकारी चंचल पाटील, उप मुख्य कार्य. अधिकारी जावेद शेख, शिक्षणाधिकारी संजय जावीर, गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी शिक्षण तसेच विविध अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



स्वामी म्हणाले, ‘गरीब विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये. यासाठी जिल्हा परिषद सेसमध्ये गरीब मुलांची फी भरणेसाठी जिल्हा परिषद सेसमध्ये २० लक्ष रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. यामुळे विद्यार्थी चांगले गुणवत्तेने यश मिळवतील.

सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी स्वच्छ सुंदर शाळा व सायकल बँकेसाठी चांगले काम केले आहे. शिक्षणाधिकारी संजय जावीर यांनी विभागातील अनेक कामांना चांगल्या प्रकारे गती देण्याचे काम केले आहे. सर्व टीम चांगले काम करीत आहे.



## अंकिता रैना, प्रार्थना ठोंबरे जोडीला दुहेरीचे विजेतेपद

✔ सुराज्य/सोलापूर

महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस असोसिएशन व सोलापूर जिल्हा लॉन टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या ओॲसिस, प्रिसीजन, जामश्री व बालाजी अमाईन्स पुरस्कृत बालाजी अमाईन्स सोलापूर ओपन २५,००० डॉलर महिला टेनिस स्पर्धेत दुहेरींच्या विजेतेपदाच्या लढतीत भारताच्या अंकिता रैना व प्रार्थना ठोंबरे या अव्वल मानांकित जोडीने केवळ ५५ मिनिटाच्या लढतीत इंडोनेशियाच्या प्रिस्का मॅडेलिन नुग्रोहो व रशियाच्या एकटेरिना याशिना या दुसऱ्या मानांकित जोडीचा ६-१, ६-२ असा सरळ सेटमध्ये सहज पराभव करत दुहेरीचे विजेतपद पटकावले.

एमएसएलटीए टेनिस सेंटर, जिल्हा क्रीडा संकुल, कुमठा नाका, सोलापूर येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत मुख्य ड्रॉच्या एकेरीच्या उपांत्य फेरीत फिनलँडच्या तिसऱ्या मानांकित अनास्तासिया कुलिकोवा हिने भारताच्या अव्वल मानांकित अंकिता रैनाचा ५-७, ७-५, ६-३ असा तर इंडोनेशियाच्या आठव्या मानांकित प्रिस्का मॅडेलिन नुग्रोहोने रशियाच्या डारिया कुडाशोवाचा १-६, ६-४, ७-५ असा पराभव करत अंतिम फेरीत धडक मारली.

## निधन वृत्त

### महादेव शिंदे



**श्रीपुर** - श्रीपुर (ता. माळशिरस) येथील महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाचे सेवानिवृत्त कर्मचारी महादेव शिंदे यांचे वयाच्या ९६ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुले, सुना, नातवंडे, परतवंडे असा परिवार आहे. ते आप्पा शिंदे यांचे वडील होत.

### इरप्पा गड्डम



**सोलापूर** - सोलापूर जिल्हा यंत्रमाग धारक संघाचे अध्यक्ष पेंटप्पा गड्डम यांचे वडील इरप्पा लक्ष्मीपती गड्डम वय ९२ यांचे रविवारी १८ १२ २०२२ रोजी राहत्या घरी वार्धक्याने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात भाऊ तीन मुले दोन मुली सुना नातू नातवंडे असा परिवार आहे

## अज्ञात चोरट्याने दुचाकी पळवली

✔ सुराज्य/सोलापूर

लोखंडवाला बिल्डर्स इमारती समोर पार्क करून ठेवलेली दुचाकी क्र.एम. एच.१३. सीए.९१६८ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. ही घटना दि.१६ डिसेंबर रोजी घडली.

याप्रकरणी इम्रान शकील शेख (वय-३२, रा. संजय गांधीनगर, गरिबीहटाव झोपडपट्टी नं.२) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल जाधव हे करीत आहेत.

## भरधाव कारची मोटारसायकलला पाठीमागून धडक; दोन ठार

✔ सुराज्य/सांगोला

भरधाव कारने मोटरसायकलला पाठीमागून जोरात धडक दिल्याने मोटरसायकलवरील एक जण गंभीर जखमी होऊन जागीच ठार व दुसरी महिला हॉस्पिटलमध्ये उपचार घेत असताना मरण पावली.

ही घटना रविवार दि. १८ डिसेंबर सायं. साडेचारच्या सुमारास सांगोला मिरज रोड वरील गोडसेवाडी येथे घडली आहे. श्रीकांत दिगंबर मिसाळ (वय ५५ रा. चिनके तालुका सांगोला), भागिरथी शंकर माने (वय ६५रा. चिनके) हे मरण पावले आहे. श्रीकांत मिसाळ हे रविवार दि. १८ रोजी साडेचारच्या सुमारास एम. एच. दहा ए एन २४ ५७ या मोटरसायकलवरून चिनके येथून सांगोल्याकडे निघाले असता अज्ञात वाहनाने मोटरसायकलला जोराची धडक दिल्याने झालेल्या अपघातात श्रीकांत मिसाळ हे गंभीर जखमी होऊन मरण पावले तर भागिरथी माने ही महिला गंभीर जखमी होऊन हॉस्पिटलमध्ये उपचार घेत असताना मरण पावली. अपघात होताच कार अपघात स्थळी न थांबता निघून गेली असल्याचे कळते. याबाबत नवनाथ शिवाजी मिसाळ यांनी अज्ञात कारचालकाविरुद्ध पोलिसात गुन्हा नोंद केला आहे.

# कुर्डूवाडी आगार प्रमुखांच्या हलगर्जीपणामुळे प्रवाशांना नाहक त्रास

✔ सुराज्य/कुर्डूवाडी



**कुर्डूवाडी बस स्थानकावर शनिवारी सायं. ७ ते रात्री ९ वाजेपर्यंत बार्शीच्या दिशेने जाण्यासाठी बस नसल्यामुळे दोन-तास प्रवाशी ताटकळत बसले होते. कुर्डूवाडी आगाराच्या गलथान कारभारामुळे प्रवाशांचे हाल तर खाजगी वाहन चालकांची चांदी झाली. आगारातून एकही बस प्रवाशांसाठी सोडण्यात आली नसल्यामुळे आगारप्रमुखावर कारवाई करण्याची मागणी प्रवाशातून होत आहे.**

लग्न, ग्रामपंचायत मतदान, रविवारी सुट्टी यामुळे रिधोरे, बार्शी, बीड आदी ठिकाणी जाण्यासाठी बसस्थानकावर शनिवारी सायंकाळी सात वाजल्यापासून प्रवाशी उभे होते. लांब पल्ल्याच्या बस गाड्या येतानाच हाउसफुल येत असल्यामुळे प्रवाशांना बसमध्ये पाऊल ठेवणे एवढेही जागा उपलब्ध होत नव्हती. यामुळे बार्शीच्या दिशेने जाणाऱ्यांची संख्या हळूहळू वाढत गेली जवळपास २०० प्रवासी बस स्थानकावर उभे होते. यामध्ये वृद्ध, महिला, लहान मुले, मुली अशा प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागला. याकडे एसटीतील कुठलाही वरिष्ठ अधिकारी बस स्थानकावर आले नाहीत.

### खाजगी वाहन चालकांची चांदी

बार्शीच्या दिशेने प्रवाशांची संख्या वाढल्याने खाजगी वाहन चालकांनी याचा गैरफायदा घेत बार्शीसाठी एका व्यक्तीला १५० रूपये घेत असल्याचे चित्र दिसत होते. तर वैतागलेली ही प्रवासी दीडशे रुपये नाईलाजाने देऊन बार्शीच्या दिशेने रवाना झाल्याचे दिसले.

यावेळी मिनी ट्रॅव्हल्स भरून गेल्या एसटीच्या भोंगळ कारभारामुळे खाजगी वाहन चालकांची चांदी झाली. मात्र, एकही एसटी बस सोडवण्याची मेहरबानी दाखवली नाही. तर एका बाजूने एसटी तोट्यात असल्याचे ओरड करणारे आता शांत का बसलेत असा प्रश्न निर्माण झाला आहे.

### आगार प्रमुखावर कारवाईची मागणी

एसटी बसस्थानकावर दोनशे प्रवासी असतानाही आगाराने एकही बस सोडली नाही व प्रवाशांना दिलासा देण्यासाठी लांब पल्ल्याच्या बसमध्ये बसवण्यासाठी एकही संबंधित अधिकारी या ठिकाणी उपस्थित राहिला नाही. तर आकारप्रमुख घरी बसूनच राहिल्यामुळे संतप्त प्रवाशांनी आगार प्रमुखावर कारवाईची मागणी करत आहेत.

### एसटीची पंक्चर प्रवासी काढणार का?

रात्री साडेनऊच्या सुमारास मेढा सातारा-बार्शी बस क्रमांक एम. एच. १३ सी. व्ही. ७१४७ मध्ये बस हाऊसफुल्ल झाल्यानंतर वाहकाने प्रवाशांची संख्या कमी झाल्याशिवाय गाडी हलवणार नाही. क्षमतेपेक्षा प्रवासी जास्त झाले आहेत, अशी भूमिका घेत गाडी थांबून ठेवली तर रस्त्यामध्ये एसटी पंक्चर झाल्यावर प्रवासी काढणार का असा उद्धट उत्तरे प्रवाशांना देत असल्याचे दिसले.

महावितरण — महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**जाहीर निवेदन**

महावितरण पंढरपुर विभाग यांचे कडुन सर्व प्रकारच्या वीज ग्राहकांना जाहीर निवेदन करण्यात येते की, प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या बुधवारी **''ग्राहक तक्रार निवारण दिन''** आयोजीत करण्यात येणार आहे. त्यामध्ये वीज ग्राहकांच्या समस्या, अडचणी, तक्रार, प्रश्न ऐकून त्याचे प्राधान्याने निवारण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येणार आहेत. तरी महावितरण पंढरपुर विभाग यांचे कार्यक्षेत्रातील पंढरपुर, मंगळवेढा व सांगोला तालुक्यातील सर्व वीज ग्राहकांनी याची नोंद घेऊन प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या बुधवारी म्हणजे या महिन्यामध्ये दिनांक २१.१२.२०२२ रोजी सकाळी १० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत कार्यकारी अभियंता महावितरण पंढरपुर विभाग, लिंक रोड, पोल फॅक्टरी जवळ पंढरपुर येथे हजर रहावे असे या विभागातर्फे जाहीर निवेदन करण्यात येत आहे.

**PRO/BMTZ/141/2022-23**

**कार्यकारी अभियंता (संवसु) महावितरण पंढरपूर विभाग**



## अकलूज येथे भाजपने बिलावल भुट्टोचे पोस्टर जाळले

**अकलूज** : देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे बद्दल पाकिस्तानचे बिलावल भुट्टो यांनी केलेल्या वादग्रस्त विधानानंतर संपूर्ण देशभर संतापाची लाट उसळली असून अकलूज येथे भाजपाच्या वतीने भुट्टो याचे पोस्टर जाळून निषेध व्यक्त करण्यात आला. पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री बिलावल झरदारी भुट्टो यांनी न्यूयॉर्कमध्ये पत्रकार परिषदेत सर्व मर्यादा ओलांडल्या आणि आपल्या देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्यावर अशोभनीय टीका केली भुट्टोच्या निंदनीय वक्तव्याचा त्याचा निषेध करावा तितका कमी आहे हा भारताचा अपमान आहे. बिलावल भुट्टो, पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या निषेधार्ह उद्धटपणामुळे व उतावीळ वक्तव्यामुळे तमाम भारत देशवासीय संतापले असून माळशिरस तालुका भाजपाच्या वतीने आ.रणजितसिंह मोहिते-पाटील व संघटन मंत्री धैर्यशिल मोहिते-पाटील यांच्या नेतृत्वाखाली अकलूज बिलावल भुट्टोचा पोस्टर जाळून तीव्र निषेध करण्यात आला. यावेळेस भाजपा किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब सरगर, राजकुमार पाटील, बाळासाहेब नारनवर, बाजीराव काटकर, बाळासाहेब पराडे व इतर पदाधिकारी कार्यकर्ते देशप्रेमी नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कारखाना बचावासाठी निवृत्त शिक्षक मोर्चात सहभागी : भरले

**अक्कलकोट** : दक्षीण सोलापूर तालुक्यातील सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक बोरामणी विमानतळ उभारणीसाठी व श्री सिध्देश्वर सहकारी साखर कारखाना बचावासाठी दक्षिण सोलापूर तालुक्यातील सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक सोमवारच्या संघर्ष समीतीच्या मोर्चात सहभागी होण्याचे व सेवेत असलेल्याना काळे फीत लावून काभ करण्याचे आवाहन सोलापूर जिल्हा प्राथमिक शिक्षक संघाचे नेते शिवानंद भरले यांनी केली आहे. तालुक्यातील कांही प्राथमिक व माध्यमिक शिक्षक रहीवाशी शेतकरी सुध्दा आहेत सोलापूरच्या विकासासाठी विमातळ ही श्री सिध्देश्वर सहकारी साखर कारखाना दोन्ही आवश्यक आहे हे वाचवण्यासाठी इतरा बरोबर शिक्षकांची सामाजिक जबाबदारी आहे म्हणून सोमवारच्या मोर्चात मोठ्या संखेनी उपस्थित राहावे असे भरले यांनी केली आहे.



## ह.भ.प.हनुमंत मिले यांच्या प्रथम पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रम

**अकलूज** : तांदुळवाडी ता.माळशिरस येथील वारकरी संप्रदायातील जुन्या पिढीतील वासकर फडातील मृदुंगमणी वै. हनुमंत भाऊ मिले यांचे प्रथम पुण्यतिथीनिमित्त तांदुळवाडी येथे विविध कार्यक्रमाद्वारे त्यांना विविध मान्यवरांचे हस्ते भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. यात प्रथम वर्षश्राध्दाची पूजा आटोपल्यानंतर मान्यवरांच्या हस्ते जिजाऊ मासाहेब छत्रपती शिवाजी महाराज अप्पासाहेब वासकर महाराज व हनुमंत मिले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले त्यानंतर नाशिक येथील ख्यातनाम वारकरी संप्रदायाचे संगीत गायक पंडित शंकर वैरागकर (गुरुजी) व त्यांचे शिष्य मार्फत विविध अभंगाचे शास्त्रीय संगीत रचनेद्वारे सादरीकरण करण्यात आले वैराग गुरुजी यांनी अभंगाद्वारे सध्याचे जीवन प्रत्येकाने कसे आचरण करावे यांची विविध उदाहरणे गोष्टी सांगून कार्यक्रमात रंगत भरली व उपस्थित महिला वर्ग वारकरी व ग्रामस्थांचे प्रबोधन केले व सर्वांना विठ्ठल भक्तींचे आव्हान केले. त्यानंतर पुणे येथील सुप्रसिद्ध लावणी साम्राज्ञी सुरेखा पुणेकर यांनी अभंग गवळणी गाऊन हनुमंत भाऊ मिले यांना आदरांजली वाहिली सदर कार्यक्रमास माळशिरस पंचायत समितींचे माजी उपसभापती अर्जुनसिंह मोहिते-पाटील सह शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन कल्याणरावजी काळे, सोलापूर जिल्हा कॉँग्रेसचे प्रकाश बापू पाटील,मराठा सेवा संघ पुणे प्रदेशाध्यक्ष उत्तमराव माने शेंडगे, विठ्ठल सहकारी कारखान्याचे संचालक कालिदास पाटील, वाघोली गावचे ज्येष्ठ नेते वसंत मिसाळ, पटवर्धन कुरोली चे ज्येष्ठ नेते मधुकर (आबा) नाईकनवरे, माजी उपसरपंच तथा ग्रा. सदस्य शशिकांत कदम,मिले परिवाराचे सर्व पाहुणे, गावातील वारकरी मोठ्या संख्येने या कार्यक्रमास उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ड. नागेश काकडे डॉ. राहुल मिले सुरेश कुंभार नामदेव मिले व परिवारातील सदस्य यांनी विशेष परिश्रम घेऊन कार्यक्रम पार पडला.

# सुब्रण्यम स्वामी शनिवारी पंढरपुरात येणार

**सुराज्य/पंढरपूर**

**पंढरपूर कॉरिडॉरची वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी व प्रस्तावित आराखड्यात बाधित होणाऱ्या ठिकाणांची माहिती घेण्यासाठी भाजपाचे नेते व माजी खासदार सुब्रमण्यम स्वामी यांच्या वकीलाच्या पथकाने शहरात पाहणी केली. यावेळी त्यांनी शनिवार दिनांक २४ रोजी येथील नागरिकांशी चर्चा करण्यासाठी सुब्रमण्यम स्वामी पंढरीत येणार असल्याची माहिती दिली. दरम्यान स्वामी यांचे पथक पंढरीत पाहणी करीत असताना त्यांनी मुंबई येथे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांची भेट घेवून पंढरपूर कॉरिडॉर संदर्भात चर्चा केली.**





राज्य शासनाच्या प्रस्तावित पंढरपूर कॉरिडॉरला श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर परिसरातील नागरिकांचा, स्थानिकांचा व वारकरी संप्रदायाचा मोठा विरोध होत आहे. याचाच एकभाग म्हणून वारकरी पाईक संघाचे प्रवक्ते रामकृष्ण महाराज वीर यांनी सुब्रमण्यम स्वामी यांची भेट घेवून माहिती दिली होती. यावर स्वामी यांनी सदर प्रश्नावर न्यायालयात याचिका दाखल करणार असल्याचे जाहीर केले होते. त्यानुसार स्वामी यांच्या पथकातील ॲड.मनोहर शेट्टी, ॲड. शौनक शेट्टी, ॲड.शंतनु शेट्टी व ॲड.त्रिलोक राऊते यांनी रविवारी पंढरीस भेट दिली. यावेळी त्यांनी श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरासह पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर वाडा, श्री विठ्ठलाच्या मूर्तीचे संरक्षण करणाऱ्या संत प्रल्हाद महाराज बडवे यांचे निवासस्थान, काल्याचा वाडा व मठांना भेटी देत माहिती जाणून घेतली. यानंतर प्रस्तावित कॉरिडॉरमुळे बाधित होणाऱ्या नागरिक व व्यापारी यांची भेट घेवून चर्चा केली. यानंतर पत्रकारांशी बोलताना ॲड.मनोहर शेट्टी यांनी, कोणताही विकास नागरिकांचे नुकसान करून केला जावू शकत नाही. यासाठी विविध पर्याय असतील तर शासनाने आधी त्यांचा विचार करणे गरजेचे आहे असे मत व्यक्त केले. आम्ही शासकीय आराखडा व स्थानिकांचे म्हणणे जाणून घेण्यासाठी आलो असून याबाबत स्वामी यांनी सर्व माहिती देणार आहोत. यानंतर शनिवार २४ किंवा रविवार २५ रोजी स्वामी हे स्वतः पंढरीत येणार आहेत. यावेळी ते न्यायालयीन प्रक्रीयेबाबत चर्चा करणार आहेत. यासह हिंदूची मंदिरे सरकारच्या ताब्यातून मुक्त करण्यासाठी देखील याचिका दाखल केली जाणार असल्याचे ॲड.शेट्टी यांनी सांगितले. दरम्यान सुब्रमण्यम स्वामी यांनी रविवारी राज्यपाल कोश्यारी यांची भेट घेवून पंढरपूर कॉरिडॉर संदर्भात देखील आपले मत व्यक्त केले. कॉरिडॉर करताना तेथील परंपरा, सामान्याच्या भावना यांची जपणूक झाली पाहिजे यावर चर्चा केली.

## आत्महत्येस प्रवृत्त; डॉक्टरसह ५ जणांवर गुन्हा

**सुराज्य/सोलापूर**

आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी डॉक्टरसह पाच जणांविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फलकनाज नजीरअहमद सय्यद, सर्फराज नजीरअहमद सय्यद, नजीरअहमद सय्यद, निखत सर्फराज सय्यद (सर्व.रा. मोहिते नगर, शगुन अपार्टमेंट, होटगी रोड, सोलापूर) व डॉक्टर मिलिंद सरोदे (रा.जळगाव) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

वरील संशयित आरोपी यांनी संगणमत करून फिर्यादी अहमद मो.शहानवाज मुन्शी (वय-३७, रा.रमाकांत कर्णिक नगर सोलापूर) यांचा भाऊ मयत असदउल्ला यांना मानसिक त्रास देऊन त्यांच्या मुलीला पाहण्यासाठी गेला असता त्यास मुलीस पाहू न दिले.

त्यामुळे त्याला मानसिक त्रास दिला व आत्महत्येकडे प्रवृत्त केले.तसेच डॉ.सरोदे यांनी देखील फिर्यादी यांच्या भावाला फोनवर फलकनाज यांच्यासोबत माझे प्रेम संबंध आहे. असे बोलून मानसिक खच्चीकरण केले होते म्हणून,याच त्रासाला कंटाळून फिर्यादी यांचा भाऊ असदउल्ला यांनी दि.३ डिसेंबर रोजी स्वतः चा जीव गमावला आहे. असे फिर्यादीत नमूद आहे. घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक पेटकर हे करीत आहेत.

## आ.सचिन कल्याणशेट्टी यांच्या प्रयत्नाला यश; वागदरी परिसरातील विद्युत समस्या मिटली

**अक्कलकोट** : वागदरीसह परिसरातील विद्युत समस्या वाढत असताना शेतकऱ्यांना शेतात विहिरात व बोरमध्ये पाणी असून ही पिकांना देता येत नव्हते ही बाब माजी सरपंच प्रदीप जगताप, श्रीशैल ठोंबरे यांच्यासह परिसरतील भाजपा कार्यकर्त्यांनी आ.सचिन कल्याणशेट्टी यांच्याकडे नवीन ३३ केव्ही मंजुरीबाबत पाठपुरावा केला.



जिल्हामध्ये एकमेव ३३ केव्हि मंजूर केल्यामुळे आज सदर काम पूर्ण होऊन कार्यन्वीत होत असताना या भागातील शेतकरी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचे आभार म्हणून आनंद उत्सव साजरा केल्याची माहिती गोगांवचे उपसरपंच कमलाकर सोनकांबळे यांनी दिली. वागदरीसह गोगांव, भुरीकवठे, खैराट, किरनळी, शिरवळवाडी, घोळसगाव यासह अनेक गावात कमी दाबाने लाईट आल्यामुळे मोटारी चालत नव्हते त्यामुळे शेतकऱ्यांना पाणी असून पिकांना देता येत नव्हते त्यामुळे शेतकऱ्यांना शेतात पेरलेले पिक उत्पन्न कमी प्रमाणात निघत होते व रात्र अपरात्र जीवाची पर्वा न करता शेतात पाण्यासाठी जात होते परंतु लाईट व्यवस्थित नसल्यामुळे शेतकऱ्यांना खूप त्रास होत होते आत्ता भुरीकवठे येथे ३३ के व्ही चालू झाल्यामुळे शेतकऱ्यांना व्यवस्थित लाईट व वेळेवर मिळेल यांची आशा आहे सदर प्रकल्प मंजूरी पासून सुरुवात होई पर्यंत पाठपुरावा करण्यात सरपंच संघटना तालुकाध्यक्ष प्रदीप जगताप, भाजपचे ज्येष्ठ नेते श्रीशैल ठोंबरे, श्रीमंत कुंटोजी उपसरपंच, भुरीकवठे, सौ. वनिता सुरवसे सरपंच गोगांव, शंकर उणदे, शंकर गुमते, कमलाकर सोनकांबळे उपसरपंच गोगांव, सिद्धाराम खुने, प्रदीप पाटील, बसवराज शेळके, सिद्धाराम मठपती सरपंच खैराट, सचिन घुंगरे, सुनील सांवत, संतोष पोमाजी, प्रकाश पोमाजी, कल्याणराव बिराजदार आदीने पाठपुरावा साठी प्रयत्न केले.

आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांचे वागदरी जिल्हा परिषदवर विशेष लक्ष असून आत्ता पर्यत जास्ती जास्त निधी देण्याचे प्रयत्न केले असून शेतकऱ्याचे मोठी समस्या असलेले ३३ के व्ही विदुत यंत्रणा सुरुवात झाल्यामुळे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचे खूप खूप आभारी आहे.

**- कमलाकर सोनकांबळे,** उपसरपंच, गोगांव



## घोंगडे वस्ती परिसरात बनावट ताडी कारखान्यावर राज्य उत्पादन शुल्कची धाड

### दहा जणांसह बारा लाख सतरा हजारांचा मुद्देमाल हस्तगत

**सोलापूर** : राज्य उत्पादन शुल्क विभागाने शहरातील घोंगडे वस्ती परिसरात एका बनावट ताडी निर्मिती कारखान्यावर धाड टाकून शुध्द ताडीपासून बनावट ताडी तयार करणाऱ्या दहा संशयित आरोपींसह बारा लाख सतरा हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाने दि.१७डिसेंबर शनिवारी सकाळच्या सुमारास सापळा रचून सोलापूर शहरातील घोंगडे वस्ती भवानी पेठ परिसरातील एका पत्र्याच्या शेडमध्ये धाड टाकून नैसर्गिक ताडी वापरून त्यामध्ये विविध केमिकलयुक्त पदार्थ टाकून कृत्रिमरित्या भेसळयुक्त ताडीची निर्मिती करीत असतांना १० लोकांना ताब्यात घेतले.राज्य उत्पादन शुल्क विभागाने धाड टाकली.

त्यावेळी त्याठिकाणी एका ३ हजार लिटर क्षमतेच्या निळ्या रंगाच्या टबमध्ये व एका हजार लिटर क्षमतेच्या काळ्या रंगाच्या टबमध्ये बनावट ताडीचा साठा तयार केला जात असल्याचे दिसून आले.तसेच त्याठिकाणी ५० लिटर क्षमतेच्या २९ कॅनमध्ये शुद्ध ताडी व ३० प्लास्टिक कॅरेटमध्ये ६५० मिलीच्या ताडीने भरलेल्या ३५० बाटल्यांचा साठाही आढळून आला.यासह या गुन्ह्यात रिकाम्या काचेच्या बाटल्या, प्लास्टिक कॅरेट, प्लास्टिक टब, बनावट ताडी तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे केमिकल व इतर साहित्य तसेच एक महिंद्रा बोलेरो वाहन क्र.एम.एच.१३.डी.क्यू २८४६, एक होंडा शाईन मोटरसायकल, दोन एक्टीवा स्कूटी दुचाकी वाहने इत्यादी जप्त करण्यात आले.

या गुन्ह्यातील संशयित आरोपी शिवय्या राजय्या तांडा, माणिकगौड शंकरगौड पोगुल, अंबादास नरसप्पा बिच्चल, आकाश दत्तात्रय माने, अंबादास सिद्राम इदनुर, मदन मोहन पात्रे. रोहन सुधाकर जगताप, विकास दत्तात्रय माने, अंबादास दिगंबर जगताप, नरेंद्र लक्ष्मीकांत उदगिरी यांना अटक करण्यात आली असून,य ा दहा संशयित आरोपींना १८ डिसेंबर रोजी दारुबंदी न्यायालयासमक्ष हजर केले असता, न्यायालयाने आरोपींना एका दिवसाची कस्टडी मंजूर केली आहे.



## हत्तुरे वस्तीत घरफोडी; दागिने लंपास

**सोलापूर** : गावी गेल्याचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने घर फोडून घरातील सोन्या-चांदीचे दागिने असा एकूण १९ हजार तीनशे रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना दि.१६ ते १७ डिसेंबर दरम्यान स्वामी विवेकानंद नगर हत्तूरे वस्ती येथे घडली.

फिर्यादी हे कार्यक्रमानिमित्त पुणे येथे गेल्यानंतर अज्ञात चोरट्याने त्यांच्या घराचा कडी-कोंयडा तोडून घरात प्रवेश केला. त्यानंतर घरातील तीन ग्रॅम वजनाचे सोन्याचे कानातील कर्णफुले, पाच तोळे चांदीचे पायातील पैंजण, चांदीचा कुंकवाचा करंडा, तीन तोळे चांदीचा छल्ला असा एकूण १९ हजार तीनशे रुपयांचा ऐवज चोरून नेला आहे. असे फिर्यादीत नमूद आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल फुलारी हे करीत आहे.



## राजेंद्र गिरमे यांची चेअरमनपदी निवड

**सुराज्य/माळीनगर**

माळीनगर (ता. माळशिरस) येथील दि सासवड माळी शुगर फॅक्टरी माळीनगर या साखर कारखान्याच्या नूतन चेअरमनपदी राजेंद्र उर्फ रंजनभाऊ गोपाळराव गिरमे यांची आज निवड करण्यात आली. माळीनगर साखर कारखान्याच्या सर्व संचालक मंडळाच्या सभेचे आज रविवार दि. १८ डिसेंबर रोजी कारखाना कार्यस्थळावर आयोजन करण्यात आले होते.

यावेळी सभेच्या अध्यक्षस्थानी कारखान्याचे विद्यमान चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर नंदकुमार गिरमे हे होते. यावेळी कारखान्याच्या विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. तसेच या सभेत कारखान्याचे नूतन चेअरमन म्हणून राजेंद्र उर्फ रंजनभाऊ गिरमे यांची सर्व संचालकांनी पुढील दोन वर्षासाठी एकमताने निवड केली. यावेळी कारखान्याचे होलटाईम डायरेक्टर सतीश गिरमे, व्हा. चेअरमन परेश राऊत, संचालक अशोक गिरमे, राहुल गिरमे, गणेश इनामके, मोहन लांडे, विशाल जाधव, यश बोरावके, निळकंठ भोंगळे, निखिल कुदळे, इंडिपेंडन्स डायरेक्टर सतीश साबडे, सतेज पैठणकर आदी उपस्थित होते. राजेंद्र गिरमे हे ३३ वर्ष कारखान्याचे संचालक मंडळात असून त्यांनी व्हा. चेअरमन, होलटाईम डायरेक्टरपदी काम पाहिले आहे. तसेच त्यांनी गेली १५ वर्ष मॅनेजिंग डायरेक्टरपद भूषविले असून ते आता कारखान्याचे चेअरमन झाले आहेत. या निवडीमुळे सर्व क्षेत्रात आनंद व्यक्त केला जात आहे.

# शेंड्याला लोकरी मावा अन् बुडक्याला हुमणी


## ▪ ऊस उत्पादक शेतकरी हवालदिल, समूळ निर्मूलनाची मागणी

सुराज्य सोलापूर
Classified
वधु-वर विषयक
● वधु - २६, ५.३, गोरी, १२ वी हिंदू मराठा, वडील नाहीत, आई मुलीचे पुजा सामग्रीचे दुकान, शेती ४ एकर, मुलीकरीता सर्वजातीय वर चालेल.
संपर्क : 8378879265
7028536999
(191222)

**सुराज्य/सोलापूर**

ऊसाच्या शेंड्याला लोकरी मावा आणि बुडक्याला हुमणी या दोन रोगांचा दरवर्षी प्रादुर्भाव दिसून येत असल्याने ऊस उत्पादक शेतकरी हवालदिल झाला आहे. शासनाच्या कृषी विभागासह, साखर कारखाना प्रशासनाने दोन्ही रोगांचे समूळ निर्मूलन करण्यासाठी शेतकऱ्यांना मदत करण्याची मागणी केली जात आहे.

हवेतील आर्द्रता, ढगाळ हवामान यामुळे जिल्ह्यातील अनेक आडसाली उसाच्या क्षेत्रावर लोकरी माव्याचा प्रादुर्भाव झाला आहे. वातावरण लोकरी मावा वाढीस पोषक असल्याने बरेच क्षेत्र लोकरी मावा बाधित झाले आहे.पावसामुळे लोकरी मावा वाढीचे प्रमाण जास्त आहे. दरवर्षी मावा भक्षक कीड तयार होते. या वर्षी मात्र भक्षक कीड तयार होताना दिसत नाही. ज्या भागात लोकरी



मावा पडला आहे. तेथील संपूर्ण क्षेत्रात चार ते पाच दिवसांत सर्वच भागात माव्याचे अतिक्रमण वाढत आहे. याचा परिणाम उसावर होत असून वाढ खुंटली आहे.तसेच माळ भागातील व कमी पाण्याच्या शेतीमध्ये हुमणीचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात दिसत आहे. हुमणी कीड उसाच्या मुळ्यांना पोखरून निकामी करीत आहेत. ऊस वाळत आल्यानंतर हुमणी किडीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. त्यामुळे उसाचे नुकसान होत आहे. यामुळे शेतकरी सर्व ऊस क्षेत्र फिरून पहात आहेत.

### ▪ मावा किडीमुळे ऊस उत्पादनात घट

मावा किडीला महाराष्ट्रात सलग ८ ते ९ महिने अनुकूल हवामान मिळते. जूनपासून ते मार्च महिन्यापर्यंत तापमान १६ ते ३५ अंश सेल्सिअस या दरम्यान असते. किडीच्या वाढीसाठी व प्रसारासाठी ढगाळ वातावरण, रिमझिम पाऊस, ७० ते ९५ टक्क्यांपेक्षा जास्त सापेक्ष आर्द्रता हे हवामान घटक अनुकूल ठरतात असे हवामान साधारणतः जून महिन्यापासून निर्माण होते. त्यामुळे किडीच्या अनेक पिढ्या होऊन किडीची संख्या झपाट्याने वाढते. परिणामी, संपूर्ण पीक किडीला बळी पडते. हिवाळ्यातही किडीचा प्रादुर्भाव टिकून राहतो. सप्टेंबर ते ऑक्टोबर महिन्यातील हवामान किडीसाठी जास्त पोषक असल्याने प्रादुर्भाव वाढतो. किडीच्या प्रादुर्भावामुळे ऊस उत्पादनात साधारणपणे १० ते २० टक्के, तर साखर उताऱ्यात ०.५ ते २० युनिटने घट होते.

### ▪ कारखानदार पुढाकार का घेत नाहीत

जिल्ह्यातील अनेक साखर कारखान्याचे चेअरमन गळीत हंगाम शुभारंभास लाखोंचे गाळप करणार असा ढोल बडवितात मात्र शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी ,लोकरी माव्यामुळे ऊसाची वाढ खुंडते,त्यामुळे उत्पादन कमी येते.यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते.बदल चक्कर शब्द काढत नाहीत. लाखो एकर ऊस मावामुक्त केला म्हणून कारखान्यांच्या चेअरमननी ढोल बडवावा.तर प्रत्येक कारखान्यांने नोंद असलेल्या ऊसाला लोकरी मावा व हुमणी प्रतिबंधक किटकनाशक पुरविण्यासाठी पुढे आले पाहिजे.त्या चेअरमन व संचालकांचा सत्कार करू.

**- बालाजी चव्हाण, ऊस उत्पादक शेतकरी, माढा**

डिफा ऑफिडीव्होरा, लेडी बर्ड बीटल, मायक्रोमस, क्रायसोपा व सिरफीड माशी या परभक्षी कीटकांच्या अळ्या उसावरील लोकरी मावा खातात. मित्रकीटकांच्या अळ्या शेतामध्ये दिसून आल्यास मावा किडीच्या नियंत्रणासाठी मित्रकीटक शेतामध्ये प्रसारित केल्यानंतर किमान ३ ते ४ आठवड्यांपर्यंत रासायनिक फवारणी टाळावी.

**- डॉ. शालीग्राम गांगुर्डे (कीटकशास्त्रज्ञ, मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगाव**

# लव्ह जिहाद विरोधात हिंदू समाज आक्रमक

सुराज्य/पिंपरी-चिंचवड

**पिंपरी चिंचवडमध्ये सकल हिंदू समाजाकडून विविध मागण्यांसाठी मोर्चा काढण्यात आला आहे. लव्ह जिहाद, धर्मांतर आणि गो-हत्या विरोधात कायदा अंमलात आणावा या प्रमुख मागणीसाठी हिंदू समाज आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. चिंचवड महाविहार चौक ते पिंपरीच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक इथंपर्यंत हा मोर्चा काढण्यात आला.**




'टिकलीवर श्रद्धा असती तर श्रद्धा आज टिकली असती' या फलकाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. हिंदू धर्मियांच्या विरोधात होत असलेला घटनांचा फलकाद्वारे निषेध करण्यात आला.

देशभरात लव्ह जिहाद, धर्मांतर आणि गो-हत्या विरोधी कायदा अंमलात यावा या प्रमुख मागणीसाठी पिंपरी-चिंचवडच्या सकल हिंदू समाजाच्यावतीने विराट मोर्चा काढण्यात आला. यात मोठ्या संख्येने हिंदू धर्मातील तरुण, तरुणी आणि बालगोपाल सहभागी झाले होते.

वारकरी संप्रदायाचे शिक्षण घेणारी मुलंदेखील या मोर्चात सहभागी झाले होते. डोक्यावर भगवी टोपी, हातात भगवा झेंडा घेऊन तरुण मोर्चात दिसत होते. जय श्रीरामाच्या घोषणांनी परिसर दणाणून सोडला होता.

पिंपरी-चिंचवड शहरात पहिल्यांदाच सकल हिंदू समाजाचा विराट मोर्चा झाला आहे. काही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलिसांचा चोख बंदोबस्त होता. हिंदू समाजाच्या मागण्या आता पूर्ण होणार का हे पाहणे महत्वाचे आहे.

## 'लव्ह जिहाद' विरोधात अमरावतीमध्ये मोर्चा

सुराज्य/अमरावती : दिल्ली येथील श्रद्धा वालकरसह देशात अन्य ठिकाणी झालेल्या हत्याकांड, 'लव्ह जिहाद'च्या निषेधार्थ तसेच धर्मांतर बंदी कायदा लागू करण्याच्या मागणीसाठी सकल हिंदू समाजातर्फे रविवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चाचे आयोजन करण्यात आले. यात हजारोंच्या संख्येने महिला, मुलींसह विविध हिंदुत्ववादी संघटना सहभागी झाल्या होत्या. सदर मोर्चा शहरातील राजकमल चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय असा काढण्यात आला.

## इथेनॉलवरील 'जीएसटी'मध्ये घट

सुराज्य/नवी मुंबई

**जैव इंधनयुक्त पेट्रोलमध्ये मिश्रण होणाऱ्या इथेनॉलवरील वस्तू व सेवा कर १८ टक्क्यांवरून थेट ५ टक्क्यांवर आणण्यात आला आहे. यामुळे पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रण करणाऱ्या शुद्धीकरण कारखान्यांना मदत होणार असून आयात कच्च्या तेलावरील अवलंबित्व कमी होऊन विदेशी चलनाची बचत होणार आहे.**




वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) परिषदेच्या शनिवारी पार पडलेल्या ४८ व्या बैठकीत तीन महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. वस्तू आणि सेवाकरासंबधींत हेतुपुरस्सर केल्या जाणाऱ्या चुका आणि ठराविक अनियमितता यांना गुन्हेगारी स्वरूपाचे ठरवण्याचे मान्य करण्यात आले आहे. जीएसटी कायद्याच्या अनुपालनातील अनियमिततेसाठी खटला चालवण्याची मर्यादा दुप्पट करून दोन कोटी रुपये केली आहे. मात्र, बनावट बीजकांसाठी १ कोटी रुपयांची मर्यादा कायम ठेवण्यात आली आहे. याचबरोबर स्पोर्ट्स युटिलिटी व्हेइकल्स अर्थात एसयूव्ही वाहनांच्या वर्गीकरणाबाबत परिषदेने भूमिका स्पष्ट केली.

एसयूव्ही श्रेणीतील वाहनांवर लागू होणारा २२ टक्के उपकर निश्चित करण्यासाठी वाहनांची व्याख्या निश्चित करण्यात आली आहे. ज्या वाहनांचा उल्लेख एसयूव्ही म्हणून केला आहे, इंजिन क्षमता १५०० सीसीपेक्षा अधिक, लांबी ४,००० मिमीपेक्षा जास्त आणि जिचा ग्राउंड क्लीयरन्स १७० मिमी आणि त्याहून अधिक आहे, अशा अटी पूर्ण करणाऱ्या वाहनांवर २२ टक्के उपकराचा उच्च दर लागू होतो.

## 'पुरोहित' पुस्तक प्रकाशनास विरोध

सुराज्य/पुणे

ले. कर्नल 'पुरोहित द मॅन बेटरेड' पुस्तक प्रकाशन सोहळा पुण्यातील एस. पी. कॉलेज येथे उत्साहात पर पडला आहे.

पण, त्यापूर्वीच पुण्यातील भीम आर्मी बहुजन एकता आणि मूलनिवासी मुस्लीम मंच या दोन संघटनांकडून टिळक स्मारक मंदिरासमोर आंदोलन करण्यात येत आहे. यावेळी कर्नल पुरोहित यांच्या विरोधात घोषणा देण्यात येत आहे. या कार्यक्रमास संजय बर्वे हे प्रकृतीच्या कारणांमुळे तर सत्यपाल सिंह हे पक्षाच्या महत्वाच्या बैठकीला जाणार असल्याने गैरहजर आहेत.

## ट्विटरला प्रतिस्पर्ध्यांची भिती वाटतेय?

### भारतातील 'या' प्रतिस्पर्ध्याला निलंबित केल्यानंतर चर्चेला उधान

सुराज्य/नवी मुंबई

**ट्विटरची धुरा सांभाळल्यानंतर इलॉन मस्क हे एकापाठोपाठ एक मोठे निर्णय घेत आहेत. त्यांच्या निर्णयांमुळे कंपनीमध्ये आणि युजर्समध्ये गोंधळाची स्थिती निर्माण झाली आहे. ब्ल्यू टीक सेवा शुल्कासह सुरू केल्यानंतर बनावट खात्यांची तक्रार वाढली. यानंतर ही सेवा बंद करून काही दिवसांनी परत तीन नवीन रंगांसह टीक उपलब्ध करण्यात आले. ट्विटरने काही पत्रकारांचे ट्विटर खातेदेखील निलंबित केल्याचे काही अहवालांतून समोर आले. याचा काहींकडून विरोध होत असून आता ट्विटरला आपल्या प्रतिस्पर्ध्यांचा हेवा वाटतोय की काय? असे त्याच्या एका कृतीतून दिसून आले आहे.**



ट्विटरने आपला भारतीय प्रतिस्पर्धी कू याचे खाते निलंबित केले आहे. केवळ 'Koo'च नव्हे तर ट्विटरने मास्टोडोनचे खाते देखील निलंबित केले आहे. मस्क यांनी ट्विटर घेतल्यानंतर गोंधळामुळे अनेक युजर्स मास्टोडोनकडे वळल्याचे काही अहवालांतून समोर आले होते. या कारवाईमुळे ट्विटरला आपले प्रतिस्पर्धी खुपत आहेत का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

## आता सामान्यांसाठीही एसटीचा 'स्मार्ट प्रवास'

सुराज्य/ठाणे

**एसटीशी प्रवाशाची बांधिलकी कायम राहावी यासाठी एसटी महामंडळाने सर्वसामान्यांसाठी स्मार्ट कार्ड' सेवा उपलब्ध करण्याचा निर्णय घेतला आहे. महामंडळाने तसा प्रस्ताव तयार केला असून स्मार्ट कार्ड' खरेदी करणाऱ्या प्रवाशांना प्रवासासाठी १० टक्के सवलत मिळणार असल्याची माहिती एसटीतील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.**



एसटी महामंडळाच्यावतीने विविध घटकांसाठी १ जून २०१९ पासून स्मार्ट कार्ड योजना सुरू करण्यात आली आहे.

या योजनेसाठी ज्येष्ठ नागरिक, पुरस्कारप्राप्त व्यक्ती, विद्यार्थी, अंध व्यक्ती, स्वातंत्र्यसैनिक, डायलिसिस रुग्ण यासह अन्य काही घटकांना स्मार्ट कार्ड देण्यात येते. वयवर्षा ६५ ते ७५ वयाच्या ज्येष्ठ नागरिकांना ५० टक्के, ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना १०० टक्के, तर विद्यार्थ्यांना ६६.६७ टक्के सवलत देण्यात येते. अन्य घटकांनाही सवलतीचा फायदा मिळतो. त्यामुळे हा प्रवासी एसटीशी कायम जोडला गेला आहे. आतापर्यंत ३९ लाख ८४ हजार स्मार्ट कार्डची नोंदणी झाली असून ३३ लाख ७४ हजार ५६२ कार्डचे वितरण झाले आहे.

## स्टॅम्प पेपरवर घेतलेला घटस्फोट अमान्यच; दिल्ली उच्च न्यायालय

सुराज्य/नवी दिल्ली

**हिंदू परंपरेनुसार विवाह झालेल्या जोडप्याने परस्पर संमतीने स्टॅम्प पेपरवर घेतलेला घटस्फोट मान्य होणार नाही, असे दिल्ली उच्च न्यायालयाने एका प्रकरणात स्पष्ट केले आहे.**

एका जोडप्याचा मे महिन्यात घटस्फोट झाला. हा घटस्फोट त्यांनी परस्पर संमतीने स्टॅम्प पेपरवर घेतला होता. त्यांनतर पत्नीला पोटगी देण्याचा विषय कौटुंबिक न्यायालयात होता. न्यायालयाने पत्नीला महिना सात हजार रुपये पोटगी देण्याचे आदेश पतीला दिले. याविरोधात पतीने उच्च न्यायालयात धाव घेतली. माझे वेतन १५ हजार रुपये आहे. त्यामुळे मला सात हजार रुपये पोटगी देणे शक्य नाही, असा युक्तिवाद पतीने केला.

## रेडिरेकनर दरनिश्चिती कार्यपद्धतीत लवकरच बदल

### महसूलमंत्री विखे-पाटील यांची माहिती

सुराज्य/पुणे

चालू बाजार मूल्यदर (रेडिरेकनर) ठरविण्याच्या कार्यपद्धतीवर माझा आक्षेप आहे. राज्यातील काही भागातील रेडिरेकनरचे दर गगनाला भिडलेले असल्यामुळे तेथील जमिनींचे व्यवहार करताना अडचणी येत आहेत. त्यामुळे रेडिरेकनर ठरविण्याच्या कार्यपद्धतीत पुढील महिनाभरात बदल करण्यात येतील. एक-दोन अधिकाऱ्यांच्या शिफारशीवर रेडिरेकनरचे दर ठरविले जातात, हे योग्य नाही. त्यामुळे शासनाच्या प्रत्येक



खात्याच्या अधिकाऱ्यांच्या सूचना घेऊन त्यांच्याबरोबर विस्तृत चर्चा करून मगच रेडिरेकनरचे दर यंदा ठरविले जातील, अशी ग्वाही राज्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

पुणे दौऱ्यावर आलेले महसूल मंत्री विखे-पाटील पत्रकारांशी बोलताना म्हणाले, की रेडिरेकनर ठरविण्याच्या कार्यपद्धतीत महिनाभरात बदल केले जातील. नोंदणी महानिरीक्षकांच्या शिफारशींनुसार वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी काम करणाऱ्या दुय्यम निबंधकांच्या बदलीच्या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली आहे. मात्र, बदली होऊनही काही दुय्यम निबंधक त्याच ठिकाणी काम करत आहेत. याबाबत लवकरच कार्यवाही करण्यात येईल. दुय्यम निबंधक कार्यालये भ्रष्टाचाराची कुरणे झाल्याच्याही तक्रारी आहेत.

## केजरीवाल यांना उघडे पाडणार; सुकेशचे कारागृहातून पत्र

सुराज्य/नवी दिल्ली : आर्थिक फसवणूक प्रकरणी अटकेत असणारा महाठग सुकेश चंद्रशेखर याने कारागृहातून आणखी एक पत्र जारी केले असून दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि पक्षाचे नेते सत्येंदर जैन यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. सुकेशने पत्रातून अरविंद केजरीवाल यांना उघडे पाडण्याचा इशारा या पत्रातून दिला आहे.

सुकेशने पत्रात दिल्ली महापालिका आणि गुजरात विधानसभा निवडणुकीचा उल्लेख केला आहे. तुमचे राजकारण संपण्याची ही सुरुवात आहे. तुमचे खरे रंग समोर येत असून तुम्हाला लोक नाकारतील. तुमच्या सर्व गोष्टी जगासमोर येतील याची मी खात्री करेन, असा इशाराच सुकेशने दिला आहे.

पत्रात सुकेशने हे पत्र लिहिण्यासाठी आपल्यावर कोणताही दबाव नसून, स्वच्छेने लिहित असल्याचे सांगितले आहे. यावेळी त्याने अरविंद केजरीवाल यांच्यावर आरोप करत म्हटले की केजरीवालांनी दिल्लीचे नायब राज्यपाल व्ही. के. सक्सेना यांना पत्र लिहून भाजपा आपल्याला त्यांच्या विरोधात लिहिण्यासाठी दबाव आणत असल्याचा आरोप करण्यास सांगितले होते.

## राज्यात रब्बीच्या ८५ टक्क्यांवर पेरणी

सुराज्य/पुणे

**राज्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे खरीब हंगाम वाया गेला. त्या पाठोपाठ आलेल्या रब्बी हंगामात राज्यात सरासरी लागवड क्षेत्राच्या ८५ टक्के पेरणी झाली आहे. गेल्या वर्षीच्या पेरणीच्या १२ टक्क्यांनी अधिक पेरणी झाली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत मक्याची लागवड २४ टक्क्यांनी, गव्हाची १९, तर हरभऱ्याची १७ टक्क्यांनी लागवड वाढली आहे.**

राज्यात गेल्या वर्षीपर्यंत सरासरी ५४ लाख २९ हजार १०१ हेक्टर क्षेत्रावर रब्बीची पिके घेण्यात येतात. यंदा अतिवृष्टीमुळे विहिरींसह नद्यांना मोठ्या प्रमाणात पाणी उपलब्ध आहे. त्यामुळे रब्बीचे क्षेत्र यंदा वाढण्याची अपेक्षा होती. मात्र सरासरींच्या ८५ टक्के म्हणजेच ४६ लाख २० हजार ६८६ हेक्टरवर पेरणी झाली आहे. गेल्या वर्षी हेच क्षेत्र ४१ लाख ३७ हजार ८८७ हेक्टर इतके होते. त्यामुळे गेल्या वर्षाच्या तुलनेत यंदा ११२ टक्के पेरणी झाली आहे.

## दोन रेल्वे गाड्यांमधील टक्कर टळणार

### मुंबई-दिल्ली आणि मुंबई-अहमदाबाद मार्गावर लवकरच कवच सुरक्षा प्रणाली

सुराज्य/नवी दिल्ली

**धोक्याचा सिग्नल ओलांडणाऱ्या रेल्वे गाड्यांना संरक्षण देणे आणि दोन गाड्यांमधील टक्कर टाळण्यासाठी पश्चिम रेल्वेने 'मुंबई-दिल्ली' आणि मुंबई-अहमदाबाद' मार्गावर कवच' संरक्षण प्रणालीची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठीची निविदा प्रक्रिया पूर्ण करून कंत्राटदारांना दोन कंत्राटे देण्यात आली आहेत. या प्रकल्पाचे सर्वेक्षण प्रगतीपथावर असून त्यासाठी एकूण ४६३ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. मार्च २०२४ पर्यंत या प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.**

रेल्वेच्या रिसर्च डिझाईन अॅण्ड स्टँडर्ड ऑर्गनायझेशनने (आरडीएसओ) विकसित केलेली कवच संरक्षण प्रणाली स्वदेशी असून यामध्ये लोको पायलट वेगमर्यादेनुसार मेल-एक्स्प्रेस गाड्यांवर नियंत्रण ठेवू शकला नाही, तर कवच प्रणाली कार्यरत होऊन रेल्वे गाडीतील ब्रेक यंत्रणा सक्रिय होते आणि तात्काळ गाडी थांबते. यामुळे समोरासमोर येणाऱ्या किंवा मागून येणाऱ्या गाड्यांची टक्कर टळते. रेल्वे गाड्यांच्या वाहतुकीवर थेट निरीक्षण ठेवणे, रेल्वे फाटकाजवळून जाताना स्वयंचलित शिटी वाजणे, आपत्कालिन परिस्थितीत संदेश देणे, लाल सिग्नल ओलांडण्यापासून रोखण्याचे काम ही कवच यंत्रणा करते. एखाद्या मार्गावर, रेल्वे गाडीत, रूळ आणि



सिग्नलमध्ये ही यंत्रणा बसविण्यात येते.

मुंबई-दिल्ली आणि मुंबई-अहमदाबाद मार्गावर अनुक्रमे मुंबई ते नागदा (दिल्ली मार्ग) आणि वडोदरा ते अहमदाबाद (अहमदाबाद मार्ग) दरम्यान कवच यंत्रणेची अंमलबजावणी करण्यात येणार असल्याची माहिती पश्चिम रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी दिली. या प्रकल्पासाठी ४६३ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. निविदा प्रक्रिया पूर्ण करून अनुक्रमे २१८ कोटी ५० लाख रुपये आणि २२३ कोटी रुपये खर्चाची दोन कंत्राटे कंत्राटदारांना देण्यात आल्याचे या अधिकाऱ्यांनी सांगितले.

या प्रकल्पातील विरार-वडोदरा आणि वडोदरा-नागदादरम्यान सर्वेक्षणाचे कामही प्रगतीपथावर आहे. यासंदर्भातील आणखी दोन निविदा अंतिम टप्प्यात आहे. 'कवच' प्रणाली रेल्वे गाड्या, रेल्वे रूळ, सिग्नल यंत्रणेत बसविली जाते. यामध्ये उच्च क्षमतेच्या रेडिओ कम्युनिकेशनचा वापर करण्यात येतो. ही प्रणाली प्रतितास १६० किलोमीटर वेगापर्यंतच्या मार्गावर मंजूर आहे.

## मी प्रदेशाध्यक्ष असेपर्यंत फडणवीस मुख्यमंत्री व्हावेत : बावनकुळे



सुराज्य/नागपूर

**नागपूरमधील हिवाळी अधिवेशनाच्या तोंडावर भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केलेल्या वक्तव्यावरून राजकारण तापण्याची चिन्ह आहेत. मी प्रदेशाध्यक्ष असेपर्यंत देवेंद्र फडणवीस हे (मुख्यमंत्री) झाले पाहिजेत, असे चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे. एका जाहीर कार्यक्रमात बावनकुळे हे बोलले. या वक्तव्यावरून राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू झाली आहे. विरोधी पक्षात असलल्या महाविकास आघाडीतील नेत्यांनी यावरून भाजपवर निशाणा साधला आहे.**

जो जो समाज फडणवीस यांच्याडे गेला, त्या समाजावरी अन्याय दूर करण्याचा प्रयत्न देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. यामुळे मी भाजप प्रदेशाध्यक्ष असताना देवेंद्र फडणवीस पुन्हा एकदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले पाहिजे. यावेळी चंद्रशेखर बावनकुळे यांनी (फडणवीस पुन्हा मुख्यमंत्री झाले पाहिजे) हे उपस्थितांकडून बोलावून घेतले. ही आपली सर्वांची जबाबदारी आहे. देवेंद्र फडणवीसांमागे सर्वांनी उभे राहिले पाहिजे, असे चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले. देवेंद्र फडणवीसांना फक्त मुख्यमंत्री पदावर बसवण्याकरिता नाही, तर महाराष्ट्राचे भवितव्य हे देवेंद्र फक्त देवेंद्र फडणवीसचे घडवू शकतात, हे आपण सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे, असे बावनकुळे म्हणाले.

# काँग्रेसला उर्जितवस्था देण्याचे नरोटे यांच्यासमोर आव्हान

**दीपक शेळके**

शहरात काँग्रेसची सध्या बिकट अवस्था आहे. अशा कठीण परिस्थितीमध्ये नेतृत्वाची भाकरी फिरवत काँग्रेस शहराध्यक्ष पदाची जबाबदारी उमद्या आणि तरूण चेतन नरोटे यांच्या खांद्यावर दिली गेलीय. अशा प्रतिकूल स्थितीत आगामी पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमिवर सर्वांना सोबत घेऊन शहरात काँग्रेसला उर्जितवस्था देण्याबरोबर पालिकेतील जागा टिकवणे अथवा वाढवण्याचे मोठे आव्हान पेलून दाखवत तसेच पक्षश्रेष्ठीनी टाकलेला विश्वास सार्थ ठरवण्यासाठी त्यांनी मेहनत घ्यावी लागेल. हे आव्हान साधेसुधे नाहीच.

सोलापूर शहर हा काँग्रेसचा बाल्लेकिला. काँग्रेस व राष्ट्रवादी या दोनही पक्षांनी आघाडीच्या माध्यमातून पालिकेत अनेक वर्षे सत्ता उपभोगली. महापौरपदासह स्थायी समिती, पक्षनेते पद अशी महात्वाची पदे ताब्यात काँग्रेसने आपल्या ताब्यात ठेवली. मात्र सन २०१७ मध्ये झालेल्या पालिकेच्या सर्वत्रिक निवडणुकीत भाजपने पालिकेची सत्ता ताब्यात घेत पालिकेवर कमळ फुलवले. भाजपचे ४९ नगरसेवक विजयी झाले तर शिवसेनेने २१ जागा जिंकत विरोधीपक्ष नेतेपद ताब्यात घेतले. सलग १५ वर्ष सत्ता भोगलेल्या काँग्रेसला १४ जागा मिळाल्या तर राष्ट्रवादीची तर नॅनो कार झाली. फक्त इन मिन चार सदस्य पालिकेत आले. राज्यात काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेनेचे महाआघाडीचे सरकार आले. राज्यातील सर्व सत्तेची समीकरणे बदलली. राष्ट्रवादीमध्ये जाण्याची स्पर्धा लागली माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे हे पक्षापासून लांब राहिले तसेच आ. प्रणिती शिंदे यांची घसरलेली पक्षावरील पकड यामुळे शहरातील काँग्रेसची वाताहत झाली. शहर काँग्रेसला देखील गळती लागली. शहरातील काँग्रेसची अवस्था बिकट झाली. माजी महापौर जेष्ठ नेते यु.एन.बेरिया. सुधीर खरटमल, नलिनी चंदेले यांनी काँग्रेसला बाय बाय करत हाती राष्ट्रवादीचे घड्याळ बांधले आणि काही मंडळी राष्ट्रवादीच्या वाटेवर आहेत. अशा कठीण परिस्थितीमध्ये पक्षाची धुरा अनुभवी चेतन नरोटे यांच्यावर आली आहे. मात्र त्यांच्या समोर आव्हानांचे मोठा डोंगर आहे.



या सर्व अडचणीवर मात करत पक्षश्रेष्ठीनी दाखवलेला विश्वास सार्थ ठरवण्याबरोबर शहरात काँग्रेसला उर्जितवस्था मिळवून देण्यासाठी मोठी कसोटी नरोटे यांची लागणार आहे.

सध्या राहुल गांधी यांच्या भारत जोडो दौऱ्यामुळे काँग्रेसमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साह आहे. तर सुशीलकुमार शिंदे यांनी देखील पुन्हा राजकारणात सक्रीय झाल्याने आहेत. आगामी पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर फायदा घेत नव्या जुन्या लोकांची योग्य सांगड घालत सर्वांना सोबत घेऊन काँग्रेसला पूर्वीचे वैभव मिळवून देणे, पालिकेतील काँग्रेसचे संख्याबळ वाढवण्याचे आव्हान नरोटे यांच्या समोर असणार आहे.

नरोटे यांच्या मागे पालिकेतील अनेक वर्षाचा अनुभव आहे. त्यांच्या मागे तरूणांची मोठी फळी आहे. त्याशिवाय धनगर समाजातील मोठे नेते असल्याने समाजबांधव त्यांच्या पाठीमागे आहेत. त्याशिवाय नरोटे धाडसी, आक्रमक आणि हजर जबाबी नेतृत्व म्हणून ओळखले जातात. विरोधकांना तशाच तसे उत्तर देण्याची धमक त्यांच्यामध्ये असल्याने पक्षश्रेष्ठींनी दाखवलेला विश्वासाला तडा जावू न देता हे आव्हान लिलया पेलत काँग्रेसला पूर्वीचे वैभव मिळवून देतील, असे राजकीय जाणकार सांगतात.

## माळशिरस तालुक्याने घालून दिला

# आदर्श राजकारणाचा धडा

**डी.एस.गायकवाड**

माळशिरस तालुक्यातील राजकारणात एकमेकांचे प्रतिस्पर्धी असणारे विजयसिंह मोहिते पाटील आणि अ‍ॅड.सुभाष पाटील यांच्या एकत्रित येण्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या असल्या तरी आदर्श राजकारणाची परंपरा त्यांनी सर्वांना घालून दिली आहे. आजकालच्या राजकारण्यांनी हा आदर्श घेण्यासारखा आहे. यामुळे लोकशाही आणखी सुदृढ झालेली दिसेल.





आजच्या धकाधकीच्या राजकारणात ब्रेकिंगवर ब्रेकिंग न्यूजने मन सून्न होत चालले असताना माळशिरस तालुक्यातील पारंपरिक विरोधक असणारे राजकारणी यांनी मात्र राजकारणाच्या परिसीमा कुठपर्यंत असाव्यात याचा आदर्श घालून देताना दिसत आहेत. दादा - अण्णाला एकत्रित पाहून खऱ्या अर्थाने तालुक्याने आदर्श राजकारणाची परंपरा जपली आहे. हा सुखाचा क्षण डोळे भरून पाहताना खरोखरच तालुका वासीयांच्या माना उंचावल्या आहेत. अभिमान वाटावा असा हा क्षण प्रत्येकांनी डोळ्यात साठवून ठेवला आहे. माळशिरस विधानसभा रणांगणावर १९९०, १९९५, १९९९ सालात एकमेकाच्या विरोधात लढलेले विजयसिंह मोहिते पाटील आणि अ‍ॅड. सुभाष पाटील यांनी कधी द्वेषाचे राजकारण केले नाही आणि एकत्रित येत आदर्श राजकारणाचा धडा घालून दिला आहे. जिल्ह्याच्या राजकारणाबरोबरच राज्याच्या राजकारणात देखील मोहिते पाटील यांचा आदर केला जातो. अजात शत्रू व्यक्तिमत्व म्हणून माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांची ओळख राहिली आहे. त्यामुळे सर्वपक्षीय नेते मंडळी मोहिते पाटील यांचा आदर करताना दिसतात.

नुकतेच एका कार्यक्रमात राष्ट्रवादीचे राजन पाटील यांनी मोहिते पाटील कुटुंबाचे गोडवे गायले. विधान परिषद निवडणुकीमध्ये भाजपाकडून अर्ज दाखल केल्यानंतर राष्ट्रवादीचे नेते खडसे यांनी इतर तिघांवर जोरदार टीकास्त्र सोडले मात्र आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांच्या बाबतीत मात्र त्यांनी गौरवोद्गार काढून स्वागत केले होते. गत लोकसभा निवडणुकीत मोहिते पाटील, उत्तम जानकर अशी नेतेमंडळी एकत्रित काम करताना पाहायला मिळाली. रामराजे नाईक निंबाळकर यांनी नुकतेच विजयसिंह हे आमचे नेते असल्याचे म्हटले होते. विजयदादा मंत्री असताना दादांचा जेवणाचा डबा इतका मोठा होता की- दादा कधी जेवायला निघतात याची इतर नेते मंडळी वाट पाहत व दादा बाहेर निघताच त्यांच्याबरोबर ते जेवणाला जात असे ऋणानुबंध मोहिते पाटील यांनी निर्माण केले आहेत.

### राजकीय सभ्यता जपली

मोहिते-पाटील यांनी नेहमीच सकारात्मक राजकारण केले राजकारणात कधी कुणाशी वैरत्व येऊ दिले नाही. राजकारणापुरते राजकारण तदनंतर समाजकारण याच ध्यासाने मोहिते पाटील नेहमी कार्यरत राहिल्याचे दिसते.राजकीय संस्कृती जपण्याचा पुरेपूर त्यांनी प्रयत्न केल्याचे अनेक उदाहरणातून दिसते. आ.संजयमामा शिंदे हे अध्यक्ष असताना शीतलदेवी मोहिते पाटील या जरी विरोधी बाकावर बसत असल्या तरी त्यांनी नेहमीच अध्यक्ष पदाच्या खुर्चीचा मान उभा राहून केला याबाबत त्यांनी एका मुलाखतीत सांगितले होते.एकूणच काय तर मोहिते पाटील यांनी नेहमीच राजकीय सभ्यता जपत जनहिताला प्राधान्य दिलेले दिसते.

### स्वागत आणि संदेश...

दादा-अण्णा यांच्या एकत्र येण्याचे स्वागत धैर्यशील मोहिते पाटील यांनी केले यावर ते तात्काळ सोशल मीडियाच्या माध्यमातून व्यक्त झाले आणि त्यांनी अलीकडील काळातील राजकारण्यांनी याचा आदर्श घ्यावा असे सूचित केले. त्यांच्या या तात्काळ व्यक्त होण्याच्या सकारात्मक भूमिकेचेही तालुकास्तरावर स्वागत होताना दिसत आहे.

# जाणकार-सुशिक्षित नगरसेवकांची गरज

**उल्हास पाटील**

शहराचा खऱ्या अर्थाने सांस्कृतिक, शैक्षणिक, वैद्यकीय, औद्योगिक, क्रीडा अशा क्षेत्रांचा सर्वांगीण विकास जर व्हायचा असेल तर केवळ साक्षर असून चालणार नाही. विकासाची दृष्टी असणारे सर्व क्षेत्रातील जाणकार उच्चशिक्षित सुशिक्षित नगरसेवक असणे गरजेचे आहे. उच्चशिक्षित, नेतृत्व असले की त्याला शहराची गरज लक्षात येते. कोणत्या गोष्टीमुळे शहराचा कशाप्रकारे विकास होईल यासंबंधी तो नवी दिशा धोरण ठरवू शकतो. यासाठी केवळ रबर स्टॅम्प साक्षर असून चालणार नाही तर उच्चशिक्षित असणे गरजेचे आहे.

सुशिक्षित माणूस राजकारणापेक्षा समाजकारणाला अधिक महत्व देईल. विकासकामे यापूर्वी अनेक नेत्यांनी केली आहेत. त्यापैकी एक उदाहरण द्यायचेच झालेच तर स्व.डॉ.कुंतल शहा त्यापैकी एक आहेत. त्यांच्या काळातील जे भरीव आणि ठोस काम झाले ते आजही लोकांच्या स्मरणात आहे. याचा अर्थ असा नाही की- दुसऱ्या कुणी कामे केली नाहीत. पण जशी दृष्टी तसा, विकास होत असतो. त्यासाठी विकासाची व्याख्या प्रत्येकाच्या दृष्टीने वेगळी असू शकते. दर पाच वर्षात तीच ती अंतर्गत पाईपलाईन, तीच गटार, तोच रस्ता आणि तीच रोड लाईट म्हणजे विकास नव्हे. या जरी मुलभूत गरजा असल्यातरी त्यासाठी दर पाच वर्षांनी तीच ती कामे केली म्हणजे शहराचा विकास झाला असे होत नाही.



त्यासाठी दृष्टी प्रगल्भ असावी लागते. इतकी वर्षे राजकारणात राहून स्वतःच्या मुलांना व्यावसायिक, पदवी प्रवेश घेताना जर तुम्हाला दहादा विचार करावा लागत असेल, शहरात रूग्णाला कोणत्या दवाखान्यात घेऊन जायचे हे जर तुम्हाला तासभर समजत नसेल, मुलांना बाहेर बागेत घेऊन जायचे तर कुठे जायचे, सिनेमा, नाटक बघायचे असेल तर सोलापूर, पुणे गाठावे लागत असेल, क्रीडा प्रशिक्षणासाठी मुलांना बाहेरच्या अकॅडमीमध्ये जावे लागत असेल तर एवढ्या वर्षात आपण काय आणि कोणता विकास केला याचे आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे.

### काळाची पावले ओळखून विकास आवश्यक

जनतेला काय हवे आहे. शहरातील प्रत्येक नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी आपण काय प्रयत्न केला पाहिजे. त्यासाठी अगदी लहान मुलांपासून ते ज्येष्ठ वयोवृद्धांपर्यंत गरज ओळखून त्यांना पोषक असे वातावरण निर्माण केले पाहिजे. काळाची पावले ओळखून शहराचा विकास साधता आला पाहिजे. गटार,लाइट,रस्ते याही पलिकडे जाऊन शहराचा विकास करता आला पाहिजे.

# जिल्हा परिषदेत महिलाराज

**बळीराम सर्वगोड**

जि.प.च्या मिनी मंत्रालयाचा कारभार सध्या दोन महिला अधिकारी चालवत असून त्या कितपत यशस्वी होतील याकडे सर्व जिल्ह्याचे लक्ष लागून राहिले आहे. पूर्वी प्रशासन अधिकारी म्हणून चंचल पाटील यांच्याकडे होते तर अ‍ॅडिशनल सीईओ भारत धोत्रे हे होते.





हाच चार्ज सध्या चंचल पाटील यांच्याकडे प्रभारी ऍडिशनल म्हणून देण्यात आला आहे. तर नूतन प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून सहाय्यक जिल्हा अधिकारी मनीषा आव्हाळे यांच्याकडे देण्यात आला आहे. त्यामुळे या दोघींचे महिलाराज कसे असणार हा कौतुकाचा विषय जिल्हा परिषदेमध्ये होत आहे त्यामुळे जिल्ह्यात मिनी मंत्रालयाचे एकच चर्चा होत आहे. मनीषा आव्हाळे या डॅशिंग अधिकारी म्हणून पूर्वीपासून ओळख झाली आहे कारण त्यांनी आपला डॅशिंगपणा आपल्या कामातून दाखविला आहे त्यामुळे थोड्याच कार्यकाळात डॅशिंग अधिकारी म्हणून जिल्ह्यात त्यांचे नाव झाले आहे. सध्या महसूल खात्याकडे दोन खाती त्यांच्याकडे आहेतच अधिक जिल्हा परिषदेकडे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून त्यांच्याकडे चार्ज देण्यात आला आहे असे एकूण त्यांच्याकडे तीन ठिकाणचा अतिमहत्त्वाचा चार्ज सध्या आहे तर चंचल पाटील यांचेकडे अतिरिक्त उपमुख्य कार्यकारी ग्रामपंचायत चार्ज होता. त्यानंतर त्यांच्याकडे काही दिवसांपूर्वी प्रमोशन होऊन त्यांना सोलापूर जिल्हा परिषदेमध्येच जीपच्या प्रशासकीय पदी नियुक्ती करण्यात आली होती. त्यानंतर डिशनल सीईओ संतोष धोत्रे यांची पुणे येथे बदली झाल्याने त्यांच्या जागी पाटील यांची नियुक्ती करण्यात आली. त्यामुळे त्यांच्यावरही कामाचा मोठा बोजा पडला आहे. हे सर्व असे असताना पुन्हा त्यांच्या वरिष्ठ म्हणून मनीषा आव्हाळे आले आहेत. या दोघांच्या कारभाराविषयी जिल्ह्यात कुतुहलाचा विषय होत आहे. जिल्ह्यात अनेक महत्त्वाची शासकीय कामे तसेच प्रशासकीय कामे विकासाची कामे मोठ्या प्रमाणात पडून आहेत.

### जिल्ह्यातील विकास कामे ठप्प

जिल्हा परिषदेतील काम चुकार कर्मचाऱ्यांवर तातडीने कारवाई होणे गरजेचे आहे. ज्या कर्मचाऱ्यांवर कारवाई झाली आहे असे कर्मचारी अजूनही मुख्यालयातच असून त्याची चौकशी झाली पाहिजे. महत्त्वाच्या फायलींवर सह्या त्याच दिवशी तातडीने झाल्या पाहिजेत. कर्मचारी वेळेवर कामावर येणे गरजेचे आहे. ग्रामीण मधून येणाऱ्यांची कामे वेळेवर झाली पाहिजेत, अशा अनेक मागण्या नागरिकांच्या आहेत.



विकास कामाकरिता ग्रामीण भागातून अनेक अभ्यागंत, कार्यकर्ते नागरिक मोठ्या प्रमाणात जिल्हा परिषदेकडे हेलपाटे घालताना दिसत आहेत. विकास कामाला मंजुरी देण्यासाठी सर्वसाधारण सभा किंवा पालकमंत्री किंवा डीपीसी यांचा ठराव लागतो. परंतु कुठल्याही प्रकारचे ठराव वेळेवर न झाल्याने अनेक विकास कामे ठप्प झाले आहेत. ती कामे या दोन महिला अधिकारी कशा पद्धतीने हाताळतील याकडे सध्या जिल्ह्याचे लक्ष लागून राहिले आहे. गावातील पिण्याचा पाण्याचा प्रश्न असो रस्ते असो गटारी असो वैद्यकीय दवाखाने असो आरोग्य सेवा असो अशा एक ना अनेक कामांना गती गती देणे आणि मार्गी लावणे असे विषय त्यांच्या समोर राहणार असल्याचे बोलले जात आहे. निधी आहे पण करायचे काय असा प्रकार सध्या प्रशासनापुढे आहे. प्रशासकीय मंजुरी घेतल्याशिवाय कुठल्याही कामाला मंजुरी देता येत नसल्याने अनेक प्रश्न निर्माण झाले होते कालांतराने मागील महिन्यामध्ये प्रश्न बरेचसे मार्गे लागल्याने मागच्या महिन्याभरात जिल्ह्यात अनेक कामे सुरू झाले आहेत.

अशातच या दोन्ही महिलांच्या हातात अधिकार दिल्याने कुतुहलाचा विषय होत आहे. रखडलेली विकास कामे तातडीने कशी मार्गे लागतील यावर या दोन महिला अधिकाऱ्यानी लक्ष केंद्रीत करून कामे मार्गी लावली तर जिल्ह्यात एक मोठा विषय ठरणार आहे त्यामुळे दोन्ही महिला ज्या कामावर प्रभारी म्हणून काम करतात, कदाचित त्या कामावर त्यांना प्रशासनाकडून प्रमोशनही मिळू शकेल, अशी चर्चा होत आहे. आता यापुढे नेमके झेडपीचे काम कसे चालणार याकडे सर्वांच्या नजरा लागून राहिले आहेत.

# आनंद चंदनशिवेंनी दिला ‘एकला चलो’चा नारा

**अजित उंब्रजकर**

राज्यातील महापुरूषांच्या अवमानाच्या निषेधार्थ शुक्रवारी सोलापूर बंदचे आयोजन करण्यात आले होते. या आंदोलनात प्रामुख्याने महाविकास आघाडीतील पक्ष सहभागी झाले होते. अगदी ‘एमआयएम’नेही या आंदोलनाला पाठिंबा दिला. मात्र माजी पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या मार्फत राष्ट्रवादी प्रवेशास इच्छुक असलेले आनंद चंदनशिवे मात्र या आंदोलनात कुठेच दिसले नाही की त्यांनी पाठिंबाही दिला आहे. त्यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत या विषयासाठी आता २१ डिसेंबर रोजी मार्चा काढण्याचा निर्णय घेतला आहे. या आणि इतर अनेक बाबींवरून चंदनशिवे सध्या तरी एकला चलो च्या भूमिकेत दिसत आहेत.

बहुजन समाज पार्टीच्या माध्यमातून २००७ मध्ये चंदनशिवे राजकारणात आले. मध्यंतरी लोकसभा निवडणुकीदरम्यान त्यांनी अ‍ॅड. प्रकाश आंबेडकर यांच्यासोबत वंचितचा रस्ता धरला. मात्र त्यानंतर त्यांची माजी पालकमंत्री भरणे यांच्याशी चांगली मैत्री झाली आणि ते राष्ट्रवादीमध्ये जाण्यास इच्छुक झाले. त्यांनी भरणे यांच्या सहकाऱ्याने राष्ट्रवादीचा रस्ता धरला. त्यांच्या माध्यमातून चंदनशिवे यांनी आपल्या प्रभागात कोट्यवधींची विकास कामे आणली.



चंदनशिवे यांनी राष्ट्रवादीकडे तब्बल आठ ते दहा जागांची मागणी केली होती. त्याला अनेक जणांचा विरोधही होता. त्यामुळे त्यांचा राष्ट्रवादीतील प्रवेश रखडत गेला. अशातच जून महिन्यात राज्यातील महाआघाडीचे सत्ता गेली आणि शिंदे गट आणि भाजपचे सरकार आले. त्यामुळे चंदनशिवे यांचे नेते भरणे यांचे पालकमंत्री पदही गेले. सत्तांतरानंतर सोलापुरात अनेक राजकीय घडमोडी झाल्या. शिवसेना-राष्ट्रवादीतील अनेक नेते, कार्यकत्यांनी पक्ष सोडले. त्यामुळे चंदनशिवे यांनी सध्या तरी कोणत्याही पक्षात न जाण्याचा निर्णय घेतला. यानंतर ते कोणत्याही पक्षाच्या जवळ गेले नाहीत. आताही त्यांनी तीच भूमिका घेतल्याचे दिसून येते. त्यामुळेच ते व त्यांचे सहकारी महाआघाडीने पुकारलेल्या बंदमध्ये सहभागी झाले नाहीत. या उलट त्यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अवमानाच्या निषेधार्थ भीमसैनिकांसह आता २१ डिसेंबर रोजी मार्चा काढण्याचा निर्णय घेतला आहे. या मोर्चात सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे. चंदनशिवेंच्या या भूमिकेवरून तरी त्यांनी सध्यपरिस्थितीत एकला चलो चा नारा दिल्याचे दिसून येत आहे.





# यशोधरा हॉस्पिटलच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन

सुराज्य/सोलापूर

विडी घरकुल येथील यशोधरा हॉस्पिटलच्या सभागृहामध्ये हॉस्पिटलच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन निमाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ विनायक टेंभुर्णीकर, संस्थेचे चेअरमन डॉ बसवराज कोलूर यांच्या हस्ते व सोलापूर येथील निमा अध्यक्ष डॉ रविराज गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली झाले. यावेळी डॉ सचिन बोनगरगे, डॉ. नागनाथ जिद्दीमनी, डॉ सारिका होमकर, डॉ अपर्णा इंगळे, डॉ वैशाली आगवणे आदी उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात डॉ रविराज गायकवाड यांनी हॉस्पिटल मधील अद्यावत सुविधांविषयी सांगितले की, सोलापूरच्या वैद्यकीय सुविधेत यशोधरा हॉस्पिटलमुळे भविष्यात आमूलाग्र बदल होतील व तसेच आता वैद्यकीय सुविधेसाठी बाहेर गावी जाण्याची गरज भासणार नाही. सर्व सुविधा एकाच छताखाली उपलब्ध करून दिल्या आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ प्रणिता लांडगे यांनी केले. कार्यक्रमासाठी जनसंपर्क अधिकारी विभागाने परिश्रम घेतले.

# मेळाव्यातून राष्ट्रवादी काँग्रेस मूळ धरेल का?

**सचिन अपसिंगकर**

ज्याप्रमाणे निरंजन भूमकरांनी वैरागमध्ये स्वत:च्या ताकदीवर प्रस्थापितांना आव्हान दिले, त्याचप्रमाणे आता बार्शी तालुक्याच्या संघर्षमय राजकारणात विश्वास बारबोलेंना टिकावे लागणार आहे. नुकताच बार्शीत आ. रोहित पवार यांच्या उपस्थितीत विचार मंथन मेळावा झाला. यात बारबोलेंनी आपल्या भाषणामध्ये आगामी आव्हानांची जाणीव असल्याचे संकेत दिले आहे. मात्र तालुक्याचे राजकारण करणे हे सोपे काम नाही हे त्यांनाही माहित आहे. या पार्श्वभूमीवर आमदार पवार यांच्या मेळाव्याला महत्व होते. बारबोलेंनी हा मेळावा यशस्वी करून दाखवला असला तरी भावी निवडणुकांमध्ये तालुक्यातील प्रस्थापितांच्या विरोधात लढताना त्यांना सत्व परिक्षेलाच सामोरे जावे लागणार आहे. या मेळाव्याच्या माध्यमातून बारबोले आणि पयार्याने राष्ट्रवादी मूळ धरणार का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



मागील विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान राष्ट्रवादीचे आमदार दिलीप सोपल यांनी राजकीय परिस्थितीचा वेध घेत शिवसेनेत प्रवेश केला. त्या निवडणुकीत ऐनवेळी सोपल यांचे कट्टर समर्थक निरंजन भूमकर यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केला. भूमकर यांना त्या निवडणुकीत लक्षणीय मते मिळाली त्यानतर त्यांनी वैरागची नगरपंचायत निवडणूक राष्ट्रवादीच्या चिन्हावर लढवली. या निवडणुकीत भूमकर यांनी शिवसेना व भाजपाला पराभूत केले. त्यामुळे बार्शी तालुक्यात मरगळलेल्या राष्ट्रवादीला नवचैतन्य मिळाले. २०२२ च्या पूर्वार्धामध्ये राजकीय पुनरागमनाची वाट पाहणाऱ्या बारबोलेंनी राष्ट्रवादीची वाट धरली. या वर्षभरात त्यांनी राष्ट्रवादी सुप्रीमो शरद पवार यांच्या भेटी घेतल्या. त्यांच्या जंगी सभेच्या नियोजन केले. मात्र आरोग्याच्या कारणांमुळे ही सभा रद्द झाली. बारबोलेंना उत्साहावर विरजण पडणाऱ्या दोन घटना राष्ट्रवादी प्रवेशाबाबत घडल्या आहेत. राज्यातील महाविकास आघाडी सरकार पाय उतार झाले आणि पवारांची सभा रद्द झाली. यामुळे बारबोलेंना नव्याने काही निर्णय घेणे गरजेचे होते. बारबोलेंची राष्ट्रवादी प्रवेशाची वाट सुकर करण्यामध्ये मोठा वाटा असलेले आमदार रोहित पवार यांच्या उपस्थितीमध्ये नुकतेच मर्यादित विचार मंथन मेळाव्याचे संयोजन झाले. आमदार पवार यांनी मुक्त चिंतनातून राष्ट्रवादी कार्यकर्त्यांना पाठबळ देण्याचे काम केले.

आता माजी नगराध्यक्ष विश्वास बारबोले यांना जवळपास १३ वर्षाच्या राजकीय अलिप्तता वादातून पुढे मार्ग काढायचा आहे. त्यांचे पुत्र कृष्णराज बारबोले यांनी पाच वर्षे गत सत्तेमध्ये आमदार राऊत यांच्या बरोबरच्या युतीमधून उपनगराध्यक्षपद सांभाळले असले तरी त्या एकूणच राजकारणामध्ये बारबोलेंची भूमिका मर्यादीतच होती. त्यामुळे आता स्वतंत्रपणे आणि स्वत:च्या जिवावर आपला राजकीय सवता सुभा निर्माण करण्याची वेळ बोरबोलेंवर आलेली आहे.

आता आमदार पवाराच्या मेळाव्यानंतर जाहीर केल्याप्रमाणे शरद पवारांची सभा लवकरच होणार का? तसेच बारबोले आपली राजकीय पुर्नमांडणी कशी करतात याचा वेध बार्शीकर घेत आहेत.

### महाआघाडी होणार का

राज्यात महाविकास आघाडीची पुन्हा नव्याने मोट बांधली जात आहे. नुकत्याच झालेल्या महामोर्चाने ही आघाडी घट्ट झाली आहे. पुढे भविष्यातही स्थानिक पातळीवर वेगवेगळी पक्षीय बलाबलाची समीकरणे असली तरी महाविकास आघाडीचा फॉर्म्युला सार्वत्रिकरित्या आकाराला आणण्याचे धोरण ठरवले जात आहे. त्यामुळे बार्शीतील स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकामध्येही महाविकास आघाडी होऊ शकते. बारबोले, सोपल यांनी ऐकमेकांचे अनुभव घेतले आहेत. यापूर्वी त्यांची युती होतीच समोर आमदार राऊत यांच्यासारखा प्रबळ विरोधक असल्यामुळे कितीही राजकीय महत्वाकांक्षा असल्या तरी दोघांनाही मिळते जुळतेच घ्यावे लागणार आहे.